# मिरा भाईंदर महानगरपालिका

## स्थायी समिती सभा दि. ०८/०१/२००४

मिरा भाईंदर महानगरपालिकेची स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०८/०१/२००४ रोजी सभा सुचना क्र. २८ दि. ०३/०१/२००४ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मा. स्थायी समितीच्या सभागृहात सकाळी ११.०० वा. आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेच्या अध्यक्षस्थानी मा. सभापती श्री. मॉरस रॉड्रीक्स हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मॉरस जोसेफ रॉड्रीक्स | सभापती |
| २) | श्री. अग्रवाल धनराज नंदलाल | सदस्य |
| ३) | श्री. याकुब ईस्माईल कुरेशी | सदस्य |
| ४) | श्री. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ५) | श्री. गावंड हरेश लक्ष्मण | सदस्य |
| ६) | श्री. चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ७) | श्री. दिनेश द. नलावडे | सदस्य |
| ८) | श्री. हॅरल जॉर्ज बोर्जीस | सदस्य |
| ९) | श्री. म्हात्रे मिलन वसंत | सदस्य |
| १०) | श्री. पाटील अनंत रामचंद्र | सदस्य |
| ११) | श्री. पाटील शरद केशव | सदस्य |
| १२) | श्री. जोजफ जॉन घोन्सालविस | सदस्य |
| १३) | श्रीम. रिटा सुभाष शहा | सदस्या |

**गैरहजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. मोहन मधुकर पाटील | सदस्य |
| २) | श्री. नितीन गोपीनाथ ठाकूर | सदस्य |
| ३) | श्री. अशोक बळवंत पाटील | सदस्य |

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग आपणा सर्वांचे स्वागत करुन आजच्या सभेच्या कामकाजाला प्र. सचिवांनी सुरुवात करावी.

(प्र. सचिवांनी विषयपत्रिकेचे वाचन केले.)

**मा. सभापती :-**

नविन वर्षाचे पदार्पण झाले आहे आणि या नविन वर्षात सर्व सन्मा. सदस्य सभेच्या कामकाजात मला चांगले असे सहकार्य देतील अशी मी आशा बाळगतो.

**आसिफ शेख :-**

नविन वर्षातील पहिल्या सभेस आज सुरूवात झाली आहे आणि सर्व सन्मा. सदस्यांना आणि सभापती साहेब आपल्याला नववर्षाच्या हार्दीक शुभेच्छा. तसेच मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरीकांना नवीन वर्षाच्या हार्दीक शुभेच्छा.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९१ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

पान नं. १२ वर मी म्हटले आहे सभापती साहेब, अडचणीत आणतील आणि आमची आपल्याला अडचणीत आणण्याची इच्छा नाही. तिथे जो आहे असा शब्द आला आहे त्याऐवजी नाही हा शब्द पाहिजे. तशी दुरूस्ती करावी.

**प्रकरण क्र. १९१ :-**

दिनांक ४/१२/२००३ रोजीचे मा. स्थायी समितीचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. १७२ :-**

दि. ०४/१२/२००३ रोजीच्या मा. स्थायी समितीच्या इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मिलन म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शरद पाटील :-**

सचिव साहेब, विषय नाही तरी मला माहिती पाहिजे. पाण्याविषयी शहरात जी परिस्थिती चालली आहे त्याबाबत माहिती काय आहे आणि जी पाण्याची कपात केलेली आहे त्याची माहिती आपल्या अधिका-यांनी आणली आहे का?

**कांबळे :-**

शासनानेच दहा टक्के पाण्याची कपात केली आहे.

**शरद पाटीलः-**

याबाबत आपण काय माहिती घेतली?

**कांबळेः-**

तिन्ही महानगरपालिकेसाठी पाणी कपात केले आहे व आजपासून तीन एम.एल.डी. पाणी वाढवून देण्याचे त्यांनी मान्य केले आहे.

**शरद पाटीलः-**

पाण्याचा प्रेशर कमी आहे. त्याचे कारण काय?

**कांबळेः-**

पाणी सप्लाय होताना पाण्याचा जो ड्राव्हर आहे. तोच आहे. त्याच्यासाठी आम्ही त्यांना सुचना केली आहे की, आम्हाला तीन एम.एल.डी. पाणी वाढवून दया.

**शरद पाटीलः-**

८१ एम.एल.डी. मधून आपण पाणी कपात करु दया.

**कांबळेः-**

एरिगेशन आपले आहे त्यांच्यावर की, दहा टक्के पाणी कपात करा. पण ते ८१ एम.एल.डी. मधून पाणी कपात करु शकत नाही आणि आपण आम्हाला पूर्ण ८१ एम.एल.डी. पाणी दया असे आहे.

**शरद पाटीलः-**

ते का देवू शकत नाही.

**कांबळेः-**

त्यांचे म्हणणे तुम्ही पाणी जास्तीत जास्त वाढवून दया आणि आपले अजून पाणी कपात झालेले नाही.

**धनराज अग्रवालः-**

पाणी कपात आहे ते किती टक्के?

**कांबळेः-**

दहा टक्के कपात आहे.

**शरद पाटीलः-**

आपण सगळे पाणी घेउन संम्पमध्ये का टाकत नाही.

**कांबळेः-**

शासनाला विनंती करुन मिरा भाईंदर महानगरपालिका ही गेल्या वर्षी कपातीतून वगळण्यात आलेली आहे आणि त्याच धर्तीवर ह्याही वर्षी वगळण्यात यावे अशी आम्ही शासनाला विनंती करणार आहोत.

**आसिफ शेखः-**

पाणी कपातीतून खास बाब म्हणून वगळयात आले होते.

**कांबळेः-**

या संदर्भात शासनाकडे बैठक घ्यावी लागेल.

**मा. सभापतीः-**

पाण्याच्या संदर्भात आता सभा घ्यायची का?

**शरद पाटीलः-**

पाहणी करुन नंतर मग सभा लावण्यात यावी.

**मा. सभापतीः-**

पाहणी करुन झाल्यावर पाणी या विषयावर एक खास सभा लावण्यात यावी.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९२ चे वाचन केले.)

**याकुब कुरेशीः-**

कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थानाचे आरक्षण केले होते का?

**मिलन म्हात्रेः-**

सभापती साहेब, या विषयामध्ये १९५ ला धरुन विचारार्थ आहे.

**याकुब कुरेशीः-**

सभापती साहेब, मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर दयावे. आपण कर्मचाऱ्यांसाठी घर बांधून दया म्हणून आरक्षण ठेवले आहे व मागच्यावेळी दहा ते पंधरा लाख रुपये खर्चही केले आहेत माझ्या माहितीप्रमाणे.

**चंद्रकांत वैतीः-**

मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य याकुब कुरेशी, कर्मचाऱ्यांसाठी यापुर्वी काही खर्च ही केला आहे. यापूर्वी कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बनवण्यासाठी जी सरकारी जागा होती. पण सन्मा. नगरसेवक रोहिदास पाटील हयांचे तिथे कॉलेज झाले व आता तिथे कुठलीही जागा राहिलेली नाही आणि हया विषयावर चर्चा होते की, हा विषय उगाच घेतला. पण सध्या अस्तित्वात असलेल्या जागेमध्ये कुठे निवासस्थान बांधणार आहेत?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.)ः-**

सन्मा. सभापती साहेब, सन्मा. सदस्य याकुब कुरेशी ह्यांनी जे सभागृहामध्ये म्हटले तर सन १९८७-८८ च्या दरम्यान नवघर येथे आरक्षीत अशी जागा कर्मचाऱ्यांसाठी ठेवण्यात आली होती आणि ती आरक्षणाची जागा मा. जिल्हाधिकारी साहेबांच्या ठरावासहित ती जागा कॉलेजला देण्यात आली आणि आजचा जो प्रस्ताव सभागृहापुढे आलेला आहे. कर्मचाऱ्यांकरिता निवास स्थान बांधणेबाबत तर जे रस्त्यांच्याकडेला जे बांधकाम होते. तिथे राहत होते आणि रस्ता रुंदीकरणामध्ये ती घरे तोडण्यात आली आणि त्या पाच-सहा लोकांचा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला आहे. भाईंदर पश्चिमेला पाण्याची टाकी आहे. तिथे साठफुटी रोडवर बाबासाहेब आंबेडकर मार्गावर तिथे घरे बांधावित असे प्रस्तावित आहे.

**याकुब कुरेशीः-**

त्या चार कर्मचाऱ्यांना घर दयायचा असा प्रश्न नाही व त्याच्यासाठी माझा विरोधही नाही. पण आपण कर्मचाऱ्यांना घर बांधण्यासाठी दहा ते पंधरा लाख रुपये खर्च केला होता. ती जागा हस्तांतरित न करता आपण जागेवर खर्च केला आणि तो खर्च वाया गेला आहे, असाच प्रकार जर चालत असेल तर हया सभागृहाला सांगू इच्छितो, ह्या ज्या कर्मचाऱ्यांचा प्रश्न घेतलेला आहे. त्याच्या अगोदर हे कोर्टात गेले आहेत याचे आता मला कळले. ते कोर्टात गेले. म्हणून त्या चार कर्मचा-यांचा आपण विचार करतोय.

**धनराज अग्रवालः-**

सभापती साहेब, तिथे रस्ता रुंदीकरणामध्ये जे घर तोडले तर माझ्या मते तिथे फक्त तीनच कर्मचाऱ्यांचे घर होते आणि आपण एक लाख रुपयासाठी मंजुरी दिली आहे.

**कुदरेः-**

मा. सभापती साहेब, ती जागा आहे. ती दहा ते अठरा स्क्वेअर फीट आहे व ती अतिशय अपुरी आहे व तिथे खर्च वाया जाईल. २२/०७/०३ रोजी सर्व कर्मचा-यांची सभा झाली. त्यात जे शासकीय निवासस्थान आहे. त्याचा विचार करत आहोत. आपले अग्निशमनचे कार्यालय तिथे आहे.

म्हणून आपण ती प्रस्तावित केली आहे. सध्या ग्राउन्डचे एस्टीमेट केले आहे. त्याच्यामध्ये प्रयोजन आहे. त्याच्यामध्ये वर्ग करणार आहोत.

**याकुब कुरेशीः-**

मला आपल्याला प्रश्न विचारायचे आहे. ती जागा अतिशय उत्तम आहे. पण तिथे आपल्याला भविष्यात अंडर ग्राउन्ड पाण्याची टाकी घ्यायची आहे. तिथे प्रस्तावित टाकीचे काम चालू आहे. टाकी तिथे अव्हेलेबल आहे. पाण्याच्या टाकीच्या कंपाउन्डमध्ये घर बांधू नये असे मी आपणास विनंती करतो.

**कुदरेः-**

अनेक वर्षापासून ते स्वतःच्या मालकीचे त्यांचे निवासस्थान होते आणि चर्चेमध्ये असे ठरले की, तिथे घर बांधावे आणि तिथे असे काही नाही आहे. फक्त सव्वा दोनशे स्क्वेअर फिटप्रमाणे केली आहे.

**धनराज अग्रवालः-**

सभापती महोदय, ते कोर्टात गेले आहे आणि कोर्टाचा निकाल कधी लागेल ते अजून आपल्याला माहिती नाही आहे आणि ती रक्कम आहे नऊ लाख शहाण्णव हजार रुपये तर आयुक्त साहेबांनी आपल्याकडे अवलोकनार्थ सादर का केले नाही?

**आसिफ शेखः-**

सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवाल हयांनी जी सुचना मांडली आहे. ती दहा लाखाच्या आतमध्ये आहे आणि त्यांच्या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे. तत्कालीन नगरपरिषदेचा इतिहास राहिला आहे आणि किती असे भरपूर प्रकरणे आपल्याकडे आहेत. आम्ही इतिहास बोलतोय आणि इतिहासावरुनच आम्ही भविष्याची कल्पना करतो. आपण चुका करत चाललो आहोत. तिच पध्दत महापालिकेच्यामार्फत चालली आहे. त्यात परिवर्तन असे काही होतच नाही. जे कर्मचारी आहेत. त्यांची निवासस्थान आहे. ते तोडण्यात आले आहे व त्यांना नवीन निवासस्थान बांधून दयायला पाहिजे. परंतु, हा प्रस्ताव आपण हया ठिकाणी आणण्यासाठी हे संबंधित कर्मचारी कोण आहेत?

**कुदरेः-**

सफाई कामगार आहेत.

**आसिफ शेखः-**

मा. आयुक्त साहेब यांच्या अखत्यारीमधला विषय आहे. म्हणून त्यांनी अवलोकनार्थ करुन आमच्यासमोर मंजुरीसाठी पाठवावे.

**मिलन म्हात्रेः-**

सभापती साहेब, कांदिवली येथे चारकोपला जे फायरबिग्रेड आहे. तिथे असे आहे की, फायरबिग्रेडच्या खाली गाडया उभ्या करतात व अधिका-यांचे कार्यालय व निवासस्थान आहे आणि कर्मचारी त्या ठिकाणी राहतात आणि हा जो प्रस्ताव आपण येथे आणला या ठिकाणी हया अगोदर फायरबिग्रेडच्या कर्मचा-यांनी मागणी केली आहे. आपण हया सफाई कामगारांना जागा दया. पण ती जागा देताना आपल्याकडे दोन पर्याय आहेत. आपण त्यांना कुठेतरी भाडयाने रुम दया आणि दुसरा एक ऑल्टर असावा. कारण तुमची आता दहा लाखाची रक्कम हे कॅम्पस बांधण्यासाठी लागणार आहे. एकदा आपण तो कॅम्पस बांधला व जसे पोलीसांनी पहिल्या माळयावरची जागा हडप केली. तुम्ही त्यांना काही बोलणार नाही. पण त्या लोकांना तुम्ही रितसर पझेशन दिले का? जो कॅम्पस तुम्ही बांधणार आहात. तिथे फायबिग्रेडच्या कर्मचा-यांना निवासस्थानाची सोय पाहिजे. कारण चोवीस तास त्यांना डयुटी असते. कारण आग कधीही लागेल तर त्यांना जावे लागते व फायरबिग्रेडच्या जवळ जर त्यांचे निवासस्थान असेल तर ते सोयीचे होईल आणि ते जे कर्मचारी कोर्टात गेले काय ते माहिती नाही. पण तरी तुम्ही तुमच्या नियमानुसार राहिले पाहिजे. तुम्ही त्यांच्या निवासस्थानाची दुसरी जागा बघा आणि जसे सन्मा. सदस्य बोलले की, तिथे भविष्यात अंडर ग्राउन्ड पाण्याची टाकी होणार आहे. त्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, तिथे अंडर ग्राउन्ड पाण्याची टाकी होणार नाही. दहा लाख रुपये खर्च करुन स्ट्रक्चर बांधले तर अलग अलग होणार आहे. म्हणून फायरबिग्रेडचा स्टाफ हयांना जोडून संलग्न बिल्डिंग घेतली तर चांगले स्ट्रक्चर बांधू शकतो आणि तिथे अधिकारी व कर्मचारी हे राहू शकतात आणि ते जे संबंधित कर्मचारी आहेत. त्यांना आपण कुठेतरी ॲडजेस्ट करा आणि भाडे घ्या. सभापती साहेब आपण हे कमिशनर साहेबांकडे पाठविणार असाल तर महत्वाचा विचार करावा व पहिले प्रफरेन्स फायरबिग्रेडला दयावे असे मला वाटते.

**रिटा शाहः-**

हया अगोदर कर्मचा-यांना निवासस्थान देण्याचे ज्या जागेवर ठरले होते. तिथे शंकर नारायण कॉलेज झाले व तिथे आपण किती खर्च केला. त्याच्याबददल आपण माहिती दया.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

आपण सभागृहात येण्यापूर्वी या विषयावर चर्चा झाली आहे. सन १९८६-८७ च्या दरम्यान नवघर येथे कर्मचाऱ्यांना जागा संपादित करण्यासाठी प्रस्ताव होता व त्या ठिकाणी माती भराव केला आहे व ती जागा जिल्हाधिकारी यांनी एस.सन. कॉलेजला दिली. त्यामुळे त्या प्रस्तावावर निर्णय होउ शकला नाही.

**चंद्रकांत वैती:-**

सभापती साहेब, सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे हयांनी सुचना केली होती की, फायरबिग्रेडच्या कर्मचाऱ्यांना निवासस्थान पाहिजे व जिथे फायरबिग्रेड आहे. तिथेच त्या कर्मचाऱ्यांची राहण्याची सोय केली पाहिजे आणि हे जे तीन कर्मचारी ॲकोमडेट करताना तसे करता येईल व त्याच्यामध्ये जास्तीत जास्त जागा फायरबिग्रेडसाठी कशी देता येईल ही अशी सुधारणा घेउन उपसुचना घेउन हा ठराव मंजुर करावा. फायरबिग्रेडची सुधारणा घेउन तो ठराव सभागृहासमोर ठेवावा

**याकुब कुरेशी:-**

सुधारणा करुन तो ठराव आणावा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्यांच्या माहितीप्रमाणे पंधरा लाखाची मंजुरी मा. महासभेकडून घेण्यात आलेली आहे.

**मिलन म्हात्रे:-**

ही जी परवानगी आहे. ती तिसऱ्या माळयाची आहे. त्याच्यामध्ये राहण्याची सोय नाही आहे व ते जे ड्रॉईंग होते. ते बघितले व त्यानंतर त्या आर्किटेकला जाउन सांगितले, तुम्ही ते व्यवस्थित करुन घ्या. त्यात क्लप करु नका. पोलिसांनी पहिल्या माळयावरची जागा हडप केली. म्हणून तुम्ही दुसऱ्या माळयावर करावे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

खांबीत, तुम्ही त्यांच्यावर दावा दाखल करावा.

**रिटा शाह:-**

जो माती भराव झाला होता. तो किती क्षेत्रामध्ये त्याची माहिती दयावी.

**दिपक खांबीत:-**

दावा कसा दाखल होईल?

**मिलन म्हात्रे:-**

मुंबई महानगरपालिकेच्या टेबलावर दावा होउ शकतो. तर आपली जागा त्यांनी हडप केली आहे. ते पोलीस आहेत. म्हणून त्यांच्यावर दावा होउ शकत नाही का?

**दिपक खांबीत:-**

दावा दाखल करण्यात येईल.

**रिटा शाह:-**

सभापती साहेब, किती क्षेत्र ॲलॉट झाले आहे व किती क्षेत्रामध्ये माती भराव झाला होता आणि आपल्या कर्मचाऱ्यांसाठी काय? त्यांच्यासाठी आपण काय प्लॅनिंग केले आहे आणि आपल्याकडे किती जागा ताब्यात पाहिजे. जिल्हाधिकाऱ्यांची किती जागा आहे? आणि त्यांनी किती क्षेत्रामध्ये बांधकाम केले आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

या बाबत आपणास लेखी स्वरुपामध्ये उत्तर देण्यात येईल.

**रिटा शाह:-**

मी लेखी स्वरुपामध्ये विचारले नाही. मी या सभेमध्ये प्रश्न विचारत आहे. आपण मला या सभेतच उत्तर दया.

**दिपक खांबीत:-**

मॅडम, माहिती घ्यावी लागेल. माहिती घेउन रिपोर्ट देतो.

**रिटा शाह:-**

ए.टी.पी. डिपार्टमेन्टला विचारा ना. किती जागा आहे?

**शेंडे:-**

मा. सभापती साहेब, आता जो प्रश्न विचारण्यात आला. त्याबाबत विषय नसल्यामुळे त्याची तयारी आम्ही केलेली नाही.

**रिटा शाहः-**

निवासस्थानाचा प्रश्न आला तेव्हा जागा ॲलॉट करुन दिले व त्या जागेवर नगरपालिकेने एवढा खर्च केला आहे आणि त्याच्यावर डिपार्टमेन्टने काय केले? आपण हा विषय पेन्डीग ठेवावा व नंतर सभागृहासमोर सविस्तर माहिती घेउन आणावे.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सा़े.)ः-**

सफाई कामगारांच्या घराचा प्रश्न आहे आणि आपण दररोज बघत असाल की, त्या सफाई कामगारांची व्यवस्था केली पाहिजे आणि जे सफाई कामगार वाल्मिकी धर्माचे लोक आहेत व त्यांची घरे रोड वायडिंगमध्ये तोडण्यात आलेली आहेत व त्यांचे पुर्नवसन करणे ही नगरपालिकेची जबाबदारी आहे व ती आपण घ्यावी व ती जबाबदारी आपल्यावर आल्यामुळे आपण खर्च करु शकतो आणि हया संबंधी शासनाने सफाई कामगार आयोग नियुक्त केले आहे. त्यांच्यावर कार्यवाही करावी. त्यांची जी घरे तोडण्यात आलेली आहे. त्यांचे पुर्नवसन करावे. म्हणून हया सभागृहासमोर प्रस्ताव आणलेला आहे.

**रिटा शाहः-**

पुर्नवसनाची रक्कम किती आहे?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सा़े.)ः-**

नऊ लाख शहाण्णव हजार एवढी आहे.

**मिलन म्हात्रेः-**

आपण जो आता आयोगाचा उल्लेख केला आहे. तर फायरबिग्रेडचादेखील पॅटर्न आहे व ते देखील नियमात आहे.

**मा.सभापतीः-**

फायरबिग्रेडचे अधिकारी आमच्याकडे आले होते.

**मिलन म्हात्रेः-**

तुम्हाला जागा जास्त मिळाली. पण त्याच विषयात मोठी बिल्डींग बांधून तुम्ही त्याच्यामध्ये समावेश करा व सुधारित असा प्लॅन काढावा.

**आसिफ शेखः-**

त्यांना तिथे जागा दया. फायरबिग्रेडचा प्रस्ताव मा. महासभेमध्ये गेला आहे.

**मिलन म्हात्रेः-**

काशीमिरा रोड स्मशानभुमीमध्ये तीन रुम खाली पडले आहेत.

**चंद्रकांत वैतीः-**

विषय असा होता की, फक्त तीन कर्मचा-यांना घर दयायचे होते आणि त्या इमारतीच्या प्रस्तावासाठी पंधरा लाख रुपयाची मंजुरी दिली होती. त्याच्यात फायरबिग्रेडचे कर्मचारी घ्यायचे व जी सुधारणा करता येईल. ती सुधारणा घ्यायची आहे. ते सफाई कामगार हे मागासवर्गीय आहेत आणि आपल्याकडे जागेची उपलब्धता आहे.

**मिलन म्हात्रेः-**

त्यांना तिथे रुम बांधून भाडयाने दयायचे आहे. तर काशीमिरा स्मशानभूमी येथे खोली रिकामी आहे. तिथे तुम्ही त्यांना उदयापासून रहायला दया व ते नगरपालिकेला पे करणार आहेत.

**रिटा शाहः-**

प्रकरण क्र. १९२ हा सदरचा विषय स्थायी समितीपुढे आलेला आहे. परंतु, त्याचे एस्टीमेशन दहा लाखाच्या आतमध्ये आहे. सदर विषय कमिशनर साहेबांनी स्वतःच्या आपल्या अखत्यारीमध्ये करुन घ्यावा असा मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेखः-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाहः-**

हा विषय स्थायी समिती मंजुर करित नाही.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सा़े.)ः-**

सन्मा. सभापती साहेब व सभागृह तीन मजल्याची इमारत आपण तिथे प्रस्तावित करु व त्याचबरोबर फायरबिग्रेडचे जे कर्मचारी आहेत आणि त्या मिरा रोडच्या कर्मचा-यांचे निवासस्थान प्रस्तावित करत आहोत. यासंबंधी पुढील सभेवर आपण गोषवारा सादर करु.

**प्रकरण क्र. १९२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका वर्ग - ४ कर्मचा-यांकरिता निवासस्थान बांधणे

**ठराव क्र. १७३ :-**

mahanagarpailaka kma-caarI ³vaga-¹4´ yaaMcaI mahanagarpailaka kayaa-layaa SaojaarIla inavaasasqaanao rsta $MdIkrNaamaQyao AavaSyaktop`maaNao taoDNaoMt AalaI Aahot. ]va-rIt inavaasasqaanaamaQyao raht Aahot. %yaamauLo maaoDlaolyaa ApUNa- Garat rahNaoMsa %yaaMcaI A%yaMt gaOrsaaoya haot Aaho.

maa.Aayau@t saaao.¸ maa.]payau@t³AitËmaNa´ va saMbaMiQat kma-caarI yaaMcyaat Jaalaolyaa cacao-p`maaNao sadrcyaa kma-caa¹yaaMcyaa saaoyaIsaazI Baa[-Mdr³p´ AignaSamana kayaa-layaacyaa kMpa}MD maQyao sadrcyaa kma-caa¹yaaMsaazI inavaasasqaana baaMQaNaocaa p`stava saadr krNaoMsa saucanaa kolaI Aaho.

sadrcyaa caar kma-caa¹yaaMsaazI tLmajalaa AiQak phIlaa majalaa p`%yaokI daona inavaasasqaanao imaLUna caar inavaasasqaanao baaMQaNaocao AMdajap~k tyaar krNaoMt Aalao AsaUna BaivaYyaamaQyao AaNaKI dusara majalaa baaMQaNao Sa@ya hao[-la %yaap`maaNao Aar.saI.saI. iDJaa[-na gaRhIt Qarlao Aahot.

sadr kamaacaI AMdajap~kIya r@kma $.9¸96¸078À¹ Asauna Aar. saI. saI. iDJaa[-na va AMdajap~k mao. AakI-Jama yaaMcao kDUna krNaoMt Aalao Aahot.

sadrcao kama $.10.00 laxa rkmaocyaa Aaitla Asalyaanao maa.Aayau@t yaaMnaI %yaaMcyaa AiQakarat maMjaUrI do}na puZIla kaya-vaahI k$na AvalaaoknaakrIta sqaayaI saimatIt saadr kravaa Asaa zrava maaMDIt Aaho.

**सुचक :- श्री. रिटा शहा.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र.सचिवांनी प्रकरण क्र. १९३ चे वाचन केले.)

**रिटा शाहः-**

सदर गोषवाऱ्यावर सही कुणाची आहे? आणि सही कोणी केली आहे?

**प्र.सचिवः-**

आयुक्त साहेबांची सही आहे आणि वृक्षसंवर्धन अधिकाऱ्याने सही केली आहे.

**चंद्रकांत वैतीः-**

वृक्ष समितीवर आयुक्त साहेब हे मा. सभापती साहेब म्हणून काम करत आहेत आणि हे शहर वृक्ष हरित करायचे असा एक चांगला निर्णय घेतला आहे आाणि हयाकरिता टाटा जीप नवीन खरेदी करतोय आणि पुढच्या वर्षी आपल्याला हे शहर चांगले पहायला मिळेल अशी अपेक्षा आहे व प्रकरण क्र. १९३ हा जो विषय स्थायी समितीसमोर आलेला आहे. त्या विषयावर मी वृक्ष संवर्धन विभागाकरिता जीप टाटा २०७ डी.आय. व महिन्द्रा ५७५ ट्रॅक्टर नवीन खरेदी करणेबाबत मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाहः-**

या ठरावाला माझा विरोध आहे. जेव्हा आयुक्त साहेबांना दहा लाखाच्या आतमध्ये निर्णय घेण्याचा अधिकार आहे व ते कमिशनर पावर्समधून करत आहे व त्यांनी जो विषय मांडला आहे. त्याच्यावर मी ठराव मांडत आहे. दहा लाखाच्या आतमध्ये असल्यामुळे आपण ठराव करुन घ्यावा.

**मिलन म्हात्रे:-**

सन्मा. सभापती साहेब, मी या विषयावर बोलू इच्छितो, ते हया वृक्ष संवर्धन समितीचे पदसिध्द सभापती आहेत व ते हया समितीचे स्वतः अध्यक्ष असताना हा ठराव पास झाला आहे व त्यांना तो स्थायी समितीला कळवायचे. नियम असा बोलतो म्हणून संपूर्णपणे आर्थिक, प्रशासकीय माहिती मिळावी म्हणून आपल्याकडे रितसर पाठविला आहे आणि सन्मा. सदस्य वैती साहेबांनी जो ठराव मांडला आहे. त्याला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह:-**

ते त्यांनी आपल्याकडे मंजुरीसाठी दिले. ते मला ही माहिती आहे. मिरा भाईंदर हरित करायचे आहे, असे आपण बोलतो आणि जो बजेट त्याच्यासाठी वापरायचा आहे आणि त्यांना जो अधिकार आहे त्या अधिकाराचा वापर त्यांनी करुन घ्यावा. त्याला अपेक्षित खर्च दहा लाख एवढा आहे.

**धनराज अग्रवाल:-**

एक करोड वीस लाख रुपये घेतले आहेत. त्यांच्यात वाहन खरेदी त्यांना करता येते. हे नियमात आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्य धनराज अग्रवालजी आपण जे विचारले हा जो खर्च आहे. तो प्रामुख्याने वन विभागासाठी केला जात आहे. ट्रॅक्टर आणि ट्रॉलीची वन विभागाला आवश्यकता आहे व टाटा २०७ डी.आय. ती ही प्रस्तावित केली आहे. ती कशासाठी तर वन विभागाला काही सामान घ्यायचे असेल किंवा साईडवर पोहोचवायचे असेल त्या दृष्टीने वृक्ष प्राधिकारणाने स्थायी समितीसमोर हया विषयाची शिफारस केली आहे.

**मिलन म्हात्रे:-**

सन्मा. उपआयुक्त साहेब, आपण संपूर्ण खुलासा केलेला आहे व जेव्हा वृक्ष संवर्धन समिती स्थापन झाली. तेव्हा महानगरपालिकेचा अर्धा टक्का डायरेक्ट वृक्ष संवर्धन समितीला कन्व्हेंट होतो आणि जी बजेटची हाफ परसेन्ट अमाउन्ट आहे. ती डायरेक्ट बजेटच्या अर्धा टक्का येणार आहे. हा विषय वृक्ष संवर्धन समितीमध्ये मंजूर केला आहे. हयाचा संपूर्ण खर्च वृक्ष संवर्धनमध्ये मंजूर केला. हे टेंडर दयायच्या अगोदरची तरतुद आहे. गेलेले आहे. पंचावन्न लाख आणि बाकी राहिले ते पंचेचाळीस लाख रुपये आहेत. ते आपल्याकडे आपण जी जुनी महापालिकेने झाडे लावलेली आहेत. त्या झाडाचे संगोपन आपल्याला करायचे आहे व जी वृक्ष लागवडीमध्ये जी मेलेली झाडे आहेत. हया सगळयाकरिता आपल्याला हा खर्च अपेक्षित आहे. साहेब, मी तुम्हाला जी अमाउन्ट सांगितली आहे. ती ॲड करुन मार्चपर्यंत आपण ती रक्कम मान्य करुन घ्यावी.

**धनराज अग्रवाल:-**

त्यांनी किती झाडे लावली आहेत.

**शरद पाटील:-**

महानगरपालिकेची वाहने ठेकेदाराने वापरली नाही पाहिजे. याची दक्षता आपण घ्यायला पाहिजे आणि ठेकेदार आपली वाहने वापरत आहेत असा विषय येता कामा नये व ठेकेदाराची आणि महानगरपालिकेची जी झाडे आहेत. त्याला आपण सिम्बॉल दया. जेणेकरून लक्षात येईल की, ठेकेदाराने किती झाडे लावली आहेत आणि महापालिकेतर्फे किती झाडे लावण्यात आलेली आहेत.

**गोविन्द परब:-**

ठेकेदाराने लावलेल्या झाडाला आणि महानगरपालिकेतर्फे लावण्यात आलेल्या झाडांना वेगवेगळी अशी खुण देण्यात येईल.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

मिरा रोडमध्ये दोन हजार झाडे, भाईंदर पूर्वेला एकशे व भाईंदर पश्चिमेला दोन हजार झाडे लावलेली आहेत.

**शरद पाटील:-**

भाईंदर पूर्वेला जी झाडे लावलेली आहेत आणि जी झाडे आहेत. त्या झाडांचा फायदा होणार नाही असे मला वाटते आणि त्याची परिस्थिती सन्मा. सदस्य चंद्रकांत वैती हयांनी बघितलेली आहे. आपल्याला झाडे लावायची आहेत. तर आपण ती मोकळी रेल्वेची जागा आहे तिथे झाडे लावावीत.

**दिनेश नलावडेः-**

नवघर रोडला वृक्ष समितीने जे खड्डे केले आहेत व तिथले अतिक्रमण हटविण्यात आलेले आहेत. तसेच, टेलिफोन, लाईटचे खांब हे हटविल्यानंतर नवघरचे रोड बनविणार आहेत आणि आपण जर तेथे जे झाड लावण्यासाठी खड्डे मारले आहेत. तिथे झाडे लावल्यावर नंतर तो रोड बनविताना आपल्याला ती झाडे तोडावी लागणार आहेत. त्यामुळे झाडे लावताना आपण तशी दक्षता घ्यावी.

**आसिफ शेखः-**

ठेकेदार जी झाडे लावतो व महापालिकेतर्फे जी झाडे लावली जातात ते ओळखण्यासाठी जो रंग त्या झाडावर अथवा त्या पिंजऱ्यावर लावला जातो त्यांचा रंग वेगवेगळा दिसला पाहिजे.

**प्रकरण क्र. १९३ :-**

वृक्ष संवर्धन विभागाकरिता जीप टाटा २०७ डी. आय. (डबल कॅबिन) व महिन्द्रा ५७५ ट्रॅक्टर नवीन खरेदी करणेबाबत (मा. वृक्षप्राधिकरण समितीने शिफारस केलेले प्रकरण क्र. ०४ )

**ठराव क्र. १७४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेने चेना ते उत्तन या ७९ चौ.कि.मी. पसरलेल्या मनपा क्षेत्रात मोठया प्रमाणावर वृक्ष लागवड केलेली असून मनपाने १८ उद्याने १३ स्मशाने व मैदाने विकसित केली असून त्यांची देखभाल, निगा वृक्षसंवर्धन विभागातून केली जाते. वृक्ष संवर्धन विभागातील ट्रॅक्टर ट्रॉली, टँकर यांना जवळजवळ १३ वर्षे झाली असून २,००,००० कि.मी. इतके टॅक्टर धावलेले आहे. ट्रॅक्टर, ट्रॉली, टँकर जुने झाल्याने व सतत बिघडत असल्याने उद्याने, स्मशाने, मैदाने व लागवड केलेली झाडे यांची देखभाल करण्यास गैरसोय होते. तसेच नगरसेवक व नागरिकांच्या तक्रारीची वारंवार पाहणी करावी लागते. कामानिमित्त चेना ते उत्तन या ७९ चौ.कि.मी. पसरलेल्या विस्तीर्ण क्षेत्रात पाहणी करणे करिता जावे लागते. वृक्ष संवर्धन विभागास जीप अथवा तत्सम वाहन उपलब्ध नसल्याने कामात दिरंगाई होते. म्हणून वृक्ष संवर्धन विभागातील कामे वेळच्यावेळी व्हावीत तसेच उद्याने, स्मशाने, मैदाने व लागवड केलेली झाडे यांची देखभाल नीट व्हावी याकरिता दि. ८/१२/२००३ च्या वृक्ष प्राधिकरण समितीने वाहने खरेदी करणेस ठराव क्र.३ ने मंजूरी दिली असून त्या ठरावाचे अनुषंगाने उद्याने व वृक्षसंवर्धन विभागास एक टाटा जीप मॉडेल २०७-डीआय (डबल कॅबिन) व महिन्द्रा ट्रॅक्टर ५७५ तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे. जीप व ट्रॅक्टर खरेदीसाठी अंदाजे रु. १०,००,०००/- (दहा लाख रुपये ) रक्कमेपर्यंत,खर्च अपेक्षित असून सदर कामी २००३-०४ च्या अंदाजपत्रीय अर्थसंकल्पाच्या **फ** संकिर्ण **वृक्षारोपण कार्यक्रम** या शिर्षका अंतर्गत १,२०,००,०००/- (एक कोटी वीस लाख) मधून तरतूद उपलब्ध आहे. त्या तरतूदीमधून वाहने खरेदी करणेस मंजूरी देण्यात येत असून संबंधित विभागाने (भांडार) तातडीने वाहने शासकीय दराने खरेदी करणेंस मंजूरी देण्यात येते.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९४ चे वाचन केले.)

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. सभापती साहेब, याबाबतची न्यायालयीन कॉपी आहे का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सभापती व सन्मा. सदस्य मा. औद्योगिक न्यायालयात याबाबत निर्णय झाला होता व पुर्वी अनेक वर्षापासुन ते आपल्याकडे काम करत होते आणि त्यांनी रितसर औद्योगिक न्यायालयात अपील केली. ३०/४/१९९८ रोजी ह्या कर्मचाऱ्यांना सामावून घ्यावे असा आदेश त्यावेळेला न्यायालयाने

दिला आहे. त्यावेळेला असा आदेश त्यांनी दिला होता तेव्हा वाहन चालक हे पद मंजूर नव्हते म्हणून यावर उच्च न्यायालयात अपील देखील केली होती आणि आता आपल्याकडे ते पद उपलब्ध आहे व ते स्थानिक कर्मचारी आहेत. त्या स्थानिक कर्मचा-यांना जर आपण मंजूरी दिली तर त्यांना सुद्धा न्याय मिळेल. ते आपल्याकडे सन १९९३-९४ पासून काम करत आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

सन्मा. केळकर साहेब, माझ्या माहितीनुसार सेक्शनमध्ये बदल झालेला आहे. आपल्या कामगारांचे अपिल हे मॅटमध्ये झाले का औद्योगिक कोर्टामध्ये झालेले आहे व ह्याच्यामध्ये आपण अपिल वगैरे काय केले आहे का? आणि तो आदेश न घेता आपण काहीतरी करतोय व आपण भावनेच्या आधारे जाउन लगेच काहीतरी निर्णय घेउ. तर असे न करता ह्याची सर्व फायनल लिगल माहिती घ्या व नंतर निर्णय घ्या.

**मा. केळकर सो. :-**

१९/८/२००३ रोजी त्यांनी अभिप्राय दिला. व ह्या तीन कर्मचा-यांना आस्थापनेत जर सामावून घेतले तर आर्थिक बोजा येईल व जास्त असणार आहे. व त्यांनी आम्हाला कुठलाही लाभ नको असे सांगितले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

महत्त्वाचा विषय असताना कोर्टाची ऑर्डर व जी. आर. आपणाकडून देण्यात यावा.

**रिटा शाह :-**

हा मुद्दा न्यायप्रविष्ट आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

हे कर्मचारी नगरपालिका असल्यापासून आहेत व ४९१ अन्वये त्यांना आपण ज्या तारखेपासून रूजु करणार त्या तारखेपासून रूजु होण्यास ते ॲग्री आहेत व त्यांनी स्टॅम्प पेपरवर आम्हाला लिहून दिले आहे.

**रिटा शाह :-**

महत्त्वाचे जे कागदपत्र आहेत ते आपण स्थायी समितीसमोर सादर करायला पाहिजे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण एखाद्या कर्मचा-याला भरती करतो व आपण त्याला २४० दिवस कन्टीन्यू करता तर त्याच्यामध्ये त्या अधिका-याची काहीतरी मिलीभगत असेल आणि त्या अशा अधिका-यावर आपण कार्यवाही का करत नाही? आपण अशा अधिका-यावर कार्यवाही करायला पाहिजे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

त्यावेळेला नगरपालिका होती आणि हा १९९३ पुर्वीचा प्रकार आहे आणि जवळ जवळ १९९०-९१ पासून कामाला असताना आपल्याकडे संचालक नगरपालिका प्रशासन ह्यांच्याकडून पदनिर्मिती करायची होती परंतु पद निर्मितीचा प्रस्ताव निर्मित झाला आणि शववाहिनी घेतली व त्यानंतर ती चालविण्यासाठी आपण वाहन चालक घेतले.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझा प्रश्न तो नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपण त्यांना सन १९९१ ला कामावर ठेवले व येथे दिले आहे सन १९९३.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन १९९३ ला स्थायी समितीचा ठराव झाला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

त्यांना ठेवायचे व नंतर कायम स्वरुपी करुन घ्यायचे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

ठेका पद्धतीवर त्यांची नेमणूक केली होती व त्यांचा ठेका टरमीनेट त्यावेळेला केला गेला नाही असे दिसून येते.

**धनराज अग्रवाल :-**

त्या माणसांची परत रि-सर्व्हीस केली पाहिजे. अन्यथा त्यात महानगरपालिकेचा तोटा होणार आहे आणि हा तोटा कोणी केला?

**आसिफ शेख :-**

ठेका पद्धतीने घेतले आणि ते कोर्टात गेले असे किती कर्मचारी आहेत.

**रिटा शाह :-**

आपण त्यांना असे टर्मीनेट करायला नको होते.

**चंद्रकांत वैती :-**

वाहन चालक सेवेत घेतले आणि त्यांनी न्यायालयात दावा दाखल केला होता आणि कोर्टाने असे सांगितले की त्यांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर घ्यावे कारण त्यांनी २४० दिवसापेक्षा अधिक काळ काम केले होते आणि महानगरपालिकेत तेव्हा देखील ती पदे रिक्त असावीत कारण ते न्यायायलात होते आणि न्यायालयाने त्यांना आस्थापनेवर सामावून घेण्याचा आदेश दिलेला आहे आणि संबंधित कर्मचारी ह्यांनी स्पष्ट सांगितले आहे की, आम्हाला वेतनाव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा लाभ किंवा फायदा नको. व नगरपालिकेत ते केव्हापासून काम करत आहेत त्याकरिता त्यांना कायमस्वरूपी आस्थापनेवर सामावून घेणेबाबत मी ठराव मांडत आहे.

**आसिफ शेख :-**

या ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**मिलन म्हात्रे :-**

कोर्टात अपील दाखल केली आहे त्याचा अपील नंबर काय आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

४२३४९८ हा अपील दाखल केलेला नंबर आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या केसमध्ये लिगल कौन्सीलर आहेत व ह्या ठरावानुसार ह्या ठरावाचे इफेक्टीव्ह आपण मागे घ्यावे असे आपण त्या कौन्सीलरला सांगावेत ह्याची आपण नोंद करून घ्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

सन्मा. सभापती साहेब, त्यावेळेला अधिकारी कोण होते?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़े.) :-**

श्री. लक्ष्मणराव लटके हे होते.

**रिटा शाह :-**

ही चुक श्री. लटके साहेबांनी केली का, तुम्ही केली आहे. अशी चुक श्री. लटके साहेबांनी सुरूवातीला केली असती तर ते वाहन चालक आता परमनन्ट झाले असते.

**आसिफ शेख :-**

सन्मा. सभापती साहेबांची ह्यावर रूलिंग काय आहे?

**मा. सभापती :-**

उच्च न्यायालयातून केस मागे घ्यावे.

**रिटा शाह :-**

आपण ह्याच्यामध्ये फक्त दहा कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेली आहे आणि माझ्या हिशोबाने साठ ते सत्तर लोक आहेत.

**मिलन म्हात्रे :-**

आता जो ठराव झाला त्या ठरावाप्रमाणे मंजूर करावे व त्या ठरावाचे नियमानुसार सभागृहात वाचन झाले पाहिजे. मग त्यानंतर तो ठराव कायम करण्यात येईल आणि उच्च न्यायालयात केस तीन महिन्यांनी किंवा सहा सहा महिन्यांनी अशा तारखा येतात. त्यावेळेला तुम्हाला हा ठराव तिथे पाठवावा लागेल त्याकरिता तुम्ही त्या ठरावाचे वाचन करा

**श्रीकांत मोरे :-**

प्रकरण क्र. १९४ या ठरावाचे सभागृहापुढे वाचन केले.

**मा. सभापती :-**

सदरचा ठराव हा कायम करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १९४ :-**

मा. औद्योगित न्यायालय ठाणे यांचे आदेशानुसार ३ कर्मचारी (वाहन चालक) यांना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायमस्वरूपी सामावून घेणेबाबत.

**ठराव क्र. १७५ :-**

तत्कालीन मिरा भाईंदर नगरपरिषद मा.स्थायी समिती सभा दिनांक ९/६/९३, ठराव क्र. ३१९ अन्वये तिन वाहनचालक ठेका पध्दतीने अत्यावश्यक सेवेत रुग्णवाहीका/शववाहीनी चालविण्यासाठी नेमणुक करण्यांत आली होती. परंतु नियुक्ती किती कालावधीसाठी करावी हे ठरावात अथवा त्यांना

दिलेल्या आदेशात स्पष्ट नमुद नसल्याने सदर तिन वाहनचालक हे १९९३ पासुन १९९५ पर्यंत सतत सेवेत ठोक वेतनावर कार्यरत होते. दरम्यानचे कालावधीत त्यांनी २४० दिवस अखंडीत सेवा पूर्ण केल्यामुळे त्यांनी दि. १०/१०/१९९५ रोजी मा.औद्योगिक न्यायालय,ठाणे येथे युएलपी/६२४/९५ अन्वये दावा दाखल केला त्या दाव्याचा निकाल दि. ३०/४/१९९८ रोजी तिन वाहन चालकाचे बाजूने लागला त्या निकालात नगरपालिकेत रिक्त असलेल्या वाहनचालक या पदावर सामावून घ्यावे व थकबाकीसह अन्य सर्व फायदे कायम कर्मचाऱ्याप्रमाणे ध्यावे असे निदेश होते.

परंतु मा. औद्योगिक न्यायालयाचे निकाला विरोधात तत्कालीन नगरपालिकेने मा. उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र. ४२३४/९८ अन्वये दावा दाखल केला. मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून मा.औद्योगिक न्यायालयाच्या निर्णयास स्थगिती देवुन कायम वाहनचालकाना देण्यांत येत असलेल्या वेतनश्रेणीतील किमान दराने वेतन त्यांना देण्याबाबत सुचित केले त्यानुसार माहे ऑक्टोंबर १९९८ पासुन किमान दराने वेतन भत्त्यासह वेतन देण्यांत येत आहे. मात्र उच्च न्यायालयातील दावा अद्याप प्रलंबित आहे. त्यास अजून किती कालावधी लागेल हे निश्चित सांगता येणार नाही. तथापि सदर तिन वाहनचालकापैकी दोन कर्मचारी हे मागासवर्गीय असुन वाहनचालक पदाचे काम करीत आहेत व तीघांनसाठी महानगरपालिकेत रिक्त पदे उपलब्ध असल्याने दि. १७/९/२००३ रोजी तिन वाहन चालकांनी विनंती करुन मा.औद्योगिक न्यायालयाचा निकाल आमचे बाजूने लागला असुन मा.उच्च न्यालयातील रिटपिटीशन क्र. ४२३४/९८अन्वये नगरपालिकेने दाखल केलेला दावा अद्याप प्रलंबित असुन आम्ही महानगरपालिकेत चांगल्याप्रकारे वाहन चालकाचे काम करीत आहोत व भविष्यात आम्हाला कोणतीही शासकीय नोकरी मिळू शकणार नाही. कारण शासनाची सरळसेवा भरतीबाबतची विहीत वयोमर्यादा आम्ही ओलांडलेली आहे व मा.उच्च न्यायालयातील प्रलंबित दाव्यास नियमित उपस्थितीत रहाणे व वकीलाची फी देणे आम्हाला आर्थिक दृष्टीने परवडत नाही. करीता आमचेवर अन्याय होवु नये म्हणून आम्हाला मा.औद्योगिक न्यायालय ठाणे यांचेकडील आदेशानुसार वेतनश्रेणी लागु करुन कायम करावे व मा.उच्च न्यायालयातील दावा मागे घ्यावा. आम्ही मागील वेतन निश्चितीमुळे वेतन फरकाची थकबाकी मागणार नाही अशी विनंती केली होती. त्या अनुषंगाने महानगरपलिकेचे मा. उच्च न्यायालयातील अभियोक्ते श्री.रामचंद्र आपटे यांचेकडून तिन वाहन चालकांना रिक्त पदावर सामावुन घेता येईल काय या बाबत अभिप्राय मागविले होते. त्यानुसार श्री.रामचंद्र आपटे यांनी दिनांक १८/९/२००३ रोजी अभिप्राय देवून अभिप्रायात तीन वाहन चालका व्यतिरिक्त नविन वाहन चालकांची नेमणुक केल्यास त्यांना वेतन श्रेणी प्रमाणे वेतन दयावे लागेल व भविष्यात या तिन वाहन चालक यांचे बाजूने मा. उच्च न्यायालयाचा निकाल लागल्यास त्यांना मा.औद्योगिक न्यायालयाचे निकालानुसार त्या वेळेपासुन वेतनश्रेणी लागु करुन संपूर्ण वेतन भत्त्यासह फरक दयावा लागेल व त्याचा आर्थिक बोजा महानगरपालिकेला सोसावा लागेल तसेच त्यावेळी पुन्हा रिक्त जागेचा प्रश्न उपस्थित होवू शकतो.परंतु दि.१७/९/०३ रोजी तिन वाहन चालक यांनी मा.औद्योगिक न्यायालयाचे निकालाचे दिनांकापासून कायम वाहनचालक पदाची वेतनश्रेणी लागु केल्यास फरकाची थकबाकी मागणार नाही ही बाब महानगरपालिकेचे आर्थिक फायदयाची असुन उच्च न्यायालयात दावा चालविण्यास महानगरपालिकेचा होणारा खर्च सुध्दा वाचेल.

सबब वरील बाबीचा विचार करता तिन वाहन चालक हे १९९३ पासुन चांगल्याप्रकारे वाहनचालवीत असुन त्यांचे वयाचा विचार करता त्यांना इतरत्र कोठेही शासकिय नोकरी मिळणार नाही. तसेच त्यांना महानगरपालिका कामाचा चांगला अनुभव असल्याने तिन वाहनचालक यांनी दि.१०/१२/०३ रोजी लेखी प्रतिज्ञा पत्राद्वारे मा.औद्योगिक न्यायालयाचे दि. ३०/४/१९९८ चे निकालाचे दिनांकापासून वाहनचालक पदाची वेतनश्रेणी ३०५०-७५-३९५०-८०-४५९० लागु करणे तसेच रजे विषयी सेवा लाभ देणे बाबत दिनांक १०/१२/०३ रोजी सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसांर व अभियोक्ता श्री.रामचंद्र आपटे यांच्या अभिप्राया नुसार वरील तडजोड करणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४८१ (१) (ह) नुसार ही सभा मा.आयुक्त यांना अधिकार प्रदान करीत आहे. तसेच मा.उच्च न्यायालयातील याचिका क्र.४२३४/९८ ही मागे घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे.त्यांना सदर ठरावाच्या तारखेपासून नियमित सेवेत सामावुन घेण्यास मंजुरी देण्यांत येत आहे. त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. आसिफ शेख.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९५ चे वाचन केले.)

**रिटा शाह :-**

आपण जी नावे दिली आहेत त्याच्या कमीत कमी पन्नास ते साठ कर्मचारी आहेत त्यांना आपण का वगळले आहे?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

शासनाने आणि नगरपालिका संचालक प्रशासनाने शैक्षणिक पात्रता निश्चित केली आणि ती निश्चित करताना एल.एस.जी.डी. ही परिक्षा कंम्पलसरी केली त्याचबरोबर एम.एस.सी.आय.टी. व टायपिंग असावे असे शासनाचे निर्देश होते आणि शासन निर्णय क्रमांक २१७९३, ९५, ९७ चा आहे.

**रिटा शाह :-**

जेव्हा निर्णय आला तेव्हा आपण पत्रव्यवहार केलेला आहे का? आणि हा जो शासन निर्णय आला त्याची आपण त्या कर्मचाऱ्यांना जाणीव दिलेली आहे का? असे जी. आर. मध्ये कंम्पलसरी आहे कारण जी. आर. ची कॉपी माझ्याकडे आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

आश्वासीत २००१ योजना कर्मचाऱ्यांकरिता शासनाने लागू केली ती पदोन्नती वेतनासाठी जो निकष वापरतो तोच यामध्ये वापरावा असे नमुद केले आहे आणि आपले जे कर्मचारी आहेत त्यांना जे काय कोर्स करायचे होते व गर्व्हरमेंटची ऑर्डर होती ते आपण बायपास केले होते. एल.एस.जी.डी. ही परिक्षा सर्वांनी द्यायची आहे व जे ती परिक्षा उत्तीर्ण करणार आहे त्यांना लाभ मिळणार आहे.

**धनराज अग्रवाल :-**

हा लाभ केव्हा पासून लागू होणार आहे व किती कर्मचारी पात्र आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

आजपासून लागू होणार आहे व आजच्या तारखेला बारा कर्मचारी आहेत.

**आसिफ शेख :-**

बारा वर्षपुर्ण झालेले आहे एकूण कर्मचारी किती आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

जे पात्र आहेत त्यांची संख्या दिली आहे.

**आसिफ शेख :-**

एल.एस.जी.डी. परिक्षा उत्तीर्ण केली आहे त्यांची आश्वासित प्रगती होणार परंतु जे बारा वर्षापेक्षा जास्त काम केले आहे त्यांचे काय? पुर्वी नगरपालिकेमध्ये कसे व्हायचे शासकीय पत्र आले तर ते कुणाला माहितही पडायचे नाही आणि दाखवायचे देखील नाही त्यामुळे जे कर्मचारी इच्छूक होते ते कर्मचारी प्रशिक्षणासाठी जाउ शकले नाही. त्यामुळे आता तरी आपण सर्वांना समान न्याय द्या.

**रिटा शाह :-**

सन १९९६-९७ ला पत्रव्यवहार केलेला आहे. तेव्हा शासनाचा निर्देश द्यायला पाहिजे कारण हे कर्मचारी सर्व सारखे आहेत आणि तुम्ही त्यांना सांगितले का, हे कम्पलसरी आहे?

**आसिफ शेख :-**

आपण कर्मचाऱ्यांवर अन्याय न करता त्या सर्व कर्मचाऱ्यांना समान न्याय दिला पाहिजे.

**मिलन म्हात्रे :-**

रिटा शाह मॅडमनी जो जी.आर. दिला आहे पण एल.एस.जी.डी. चे प्रमुख आहेत त्यांच्याबरोबर ह्या विषयावर चर्चा केली तेव्हा त्यांनी असे सांगितले की, ही जी अट टाकलेली आहे ती तशी बंधनकारक आहे आणि असे कोणत्याही कायद्यामध्ये नाही की, जे कर्मचारी ज्या आस्थापनेवर आहेत त्यांनी कोर्स न करता त्यांना लाभ द्यावा किंवा श्रेणी वाढवणार आहे. ज्यांनी कोर्स केलेला नाही अशा आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांना ह्यामुळे एक चांगले वळण मिळणार आहे. व जे कर्मचारी आहेत त्यांनी तीन महिन्यामध्ये हा कोर्स पुर्ण करण्याची हमी दिलेली आहे. त्यामुळे ह्याच्यापासुन कोणालाही वंचित ठेवता येणार नाही. हा जो बारा कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव आला आहे त्याच्यामध्ये विरोध करण्यासारखे असे काहीच नाही आहे. आपण त्यांना पदोन्नती देणार त्याच्यामध्ये आपण त्यांना काय काय इफेक्ट देउ शकतो त्याचा विचार करा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

मा. संचालक प्रशासन ह्यांचे पदनिर्मिती करण्याचे ३ मार्च, १९९९ रोजीचे पत्र आहे. व त्यात पगारवाढ होणे म्हणजे ही एक तऱ्हेची पदोन्नती आहे व त्यानुसार त्या कर्मचाऱ्यांची शैक्षणिक पात्रता ग्राहीत एच.एस.सी. व एल.एस.जी.डी. परीक्षा उत्तीर्ण व पाच वर्षाचा अनुभव पाहिजे. त्याचबरोबर कोणतीही पदोन्नती देताना सेवाजेष्ठता आणि मेरीट लिस्ट हे बघितले जाते.

**रिटा शाह :-**

कर्मचाऱ्यांना पदोन्नती आवश्यक आहे. केळकर साहेब हा माझ्याकडे १० डिसेंबर, १९९८ चे सुधारित असे शासन निर्णय आहे. त्याच्यामध्ये असा कुठेही उल्लेख नाही.

**आसिफ शेख :-**

९/५/१९९० व १०/१२/१९९८ चा जी.आर. असे हे दोन जी.आर. आहेत व ह्या दोघांचा आपण विचार करावा आणि गुणवत्ता म्हणजे आपण एल.एस.जी.डी बघणार तर तसे चालणार नाही. आपण सर्वांना समान न्याय द्या व एल.एस.जी.डी. ही परीक्षा कंम्प्लसरी केली आहे असे सर्वांना सांगावे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सर्व कर्मचाऱ्यांना सांगण्यात आलेले आहे.

**आसिफ शेख :-**

पदोन्नती द्यायला विरोध कुणाचाही नाही. आपण ठराविक लोकांना देणार असाल तर ते योग्य नाही. आपण ज्यांना बारा वर्षपुर्ण झालेले आहेत त्यांना सर्वांना पदोन्नती द्यायला पाहिजे.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

तेथे पदोन्नतीचे पद उपब्लध नाही किंवा एकाकी पदावरील कर्मचा-यांना शासन निर्णयाबाबत परिशिष्ट एक मधील वेतनश्रेणी देय होईल. पाच, या योजने अंतर्गत पदोन्नतीच्या पदाची वेतनश्रेणी देय ठरली असल्याने वरिष्ठ श्रेणी मिळविण्यासाठी पदोन्नतीच्या पदाकरिता विहित केलेली अर्हता, पात्रता, ज्येष्ठता आणि विभागीय परिक्षा या सर्व बाबीची पूर्तता करणे आवश्यक असेल.

**मिलन म्हात्रे:-**

हयाच्यामध्ये तुम्ही अगोदरच्या जी.आर. वाचला. हा सेवा ज्येष्ठतेचा आहे.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

हयाला शैक्षणिक पात्रता, त्या पदासाठी निश्चित केलेली पात्रता.

**रिटा शाह:-**

तारिख काय आहे?

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

२० जुलै, २००१. याच्यामध्ये स्पष्ट त्यांनी डायरेक्टिव्ह दिल्या आहेत.

**रिटा शाह:-**

माझ्याकडे ३ ऑगस्ट, २००१ चे आहे. साहेब, मागचे पण यामध्ये अमेन्डमेन्ट झालेले आहे.

**आसिफ शेख:-**

शासन निर्णय क्र. वेतन २००० प्रत क्र. १०/सेवा/३ मंत्रालय मुंबई ३२ दिनांक ३ ऑगस्ट २००१.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

२००१ मध्ये अशा तऱ्हेचे कोणतेही म्हटले नाही की, ही पात्रता ग्राहय धरली जावी. ही पात्रता ग्राहय धरली जाईल. पदोन्नती बघताना काय काय करावे?

**मिलन म्हात्रे:-**

या विषयाचा जो ज्युनिअर क्लार्क आहे. त्याला सिनियर क्लार्क करणार का?

**आसिफ शेख:-**

सोयीस्कर अर्थ घ्यायचा तर सर्वांसाठी घ्या.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

हे जे पात्र आहे. त्यांचे नुकसान कशाला करता?

**रिटा शाह:-**

त्यांचे नुकसान आम्ही करत नाही. त्यांना तर द्याच. पण जे बाकी राहिले आहेत त्यांना पण द्या.

**आसिफ शेख:-**

याच्याबरोबरच करुन घ्या.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.)**

अधिकार आयुक्तांना दया.

**रिटा शाहः-**

मी दिले असे नाही. हा जो जी. आर. आहे. त्यामध्ये कुठेही शैक्षणिक पात्रता म्हणजे आमचा बोलायचा अर्थ आहे, त्याची पदोन्नती करु नका. पण त्यांचे वेतन तरी वाढवा.

**आसिफ शेखः-**

सन्मा. सदस्य मिलन म्हात्रे यांनी सुचना केलेली आहे. हे सगळे लिहून घ्या की, आम्ही वर्षभरात पूर्ण करु. त्यांना पण प्रमोशन देउन टाका.

**रिटा शाहः-**

त्यांचे वेतन वाढवा.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

त्यांना पण देण्याचे आयुक्तांना अधिकार आहेत.

**आसिफ शेखः-**

आयुक्तांना अधिकार आहेत. बरोबर आहे. पण तुम्ही इथे प्रस्ताव कशाला आणला? आमच्या मंजुरीसाठी तुम्ही आणला. आम्ही मंजुर करताना सर्वांचे मंजुर करणार.

**मिलन म्हात्रेः-**

हा विषय एवढा लाईटली घेउ नये. आपल्या आस्थापनेवर असे काही कर्मचारी असतील की, ते आता रिटायर होणार आहेत. पण त्यांना रिटायर होताना आयुष्यभर त्यांना केले. त्यांनी ग्रामपंचायत काळापासून काम केले आणि त्यांना जर थोडयाकरिता ही संधी आपण आपला वेळ काढूपणा किंवा हलगर्जीपणामुळे जर विचार करुन पुढच्या सभेत हा विषय घ्यावा.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

आपण वेळ काढूपणा वगैरेबद्दल जो आक्षेप घेतला. तो आम्हाला प्रशासनाला अमान्य आहे.

**रिटा शाहः-**

आम्ही कोणाचा आक्षेप दाखवत नाही.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

कोणताही यामध्ये वेळ काढूपणा, प्रत्येक कर्मचा-याला माहिती आहे की, शैक्षणिक पात्रता कोणत्या पदासाठी काय विहित केलेली आहे? त्या कर्मचा-याचे आदद्य कर्तव्य आहे. पदोन्नती जर पाहिजे असेल तर त्याने एल.एस.जी.डी. तेव्हाच करायला पाहिजे होती. त्यांनी स्वतः यामध्ये हलगर्जीपणा केलेला आहे आणि त्याचा विचार करण्याचा काहीच प्रश्न आजच्या सभागृहात उद्भवत नाही. कारण आजच्या तारखेला जे पदोन्नतीसाठी पात्र आहेत. त्याच्या नंतरसुध्दा आम्ही नगरभवनमध्ये प्रशिक्षण चालू केले होते आणि एल.एस.जी.डी. करण्यासाठी आम्ही त्यांना विनंती केली, स्थानिक स्वराज्य संस्थेला की, आमचे सर्व कर्मचारी कार्यालयीन वेळ सोडून इथे येउ इच्छित नाही. त्यांना स्वतंत्रपणे केन्द्र उभारावे. तर त्यांनी त्या विनंतीस मान देउन ते केन्द्र उभारले होते. त्या बहुतेक कर्मचा-यांनी एल.एस.जी.डी. पूर्ण केले आहे. या सर्व कर्मचा-यांचा विचार त्यांचे एल.एस.जी.डी. चे निकाल प्राप्त झाल्यानंतर निश्चित त्यांचा विचार करण्यांत येईल. त्यांना सुद्धा बारा वर्षाचा लाभ देण्याची कारवाई केली जाईल.

**मिलन म्हात्रेः-**

या ठिकाणी लोक सहा-सहा महिने एल.एस.जी.डी. करतात.

**आसिफ शेखः-**

साहेब, आमचे एवढेच म्हणणे आहे, अकरा लोक येतात. त्यावर पासष्ठ लोक शिल्लक राहिले आहेत. त्या सगळयांना आजची ही सभा मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडत आहे.

**रिटा शाहः-**

पण आम्ही सर्वांना मंजुरी देतो. अकरा लोकांना नाही तर सत्तर-बाहत्तर त्या सर्व लोकांना आम्ही मंजुरी देतो, असा मी ठराव मांडत आहे. त्या अकरा लोकांना नाही. त्याला माझेही अनुमोदन आहे.

**मा.सभापतीः-**

असे होउ शकत नाही.

**दिनेश नलावडेः-**

सध्या जो कर्मचा-यांच्या बाबतीत विषय आलेला आहे. त्याला मी मंजुरी दिलेली आहे आणि बाकीचे जे काही कर्मचारी आहे. त्याच्या पदोन्नतीप्रमाणे नियम बघुन तुम्ही पुढचा विषय आम्हाला आणून दया. आम्ही त्याला मंजुरी देतो.

**मा.सभापती:-**

नियम बघून देऊ.

**दिनेश नलावडे:-**

सन्मा. सदस्य आसिफ शेख यांनी ठराव मांडलेला आहे आणि मी त्याला अनुमोदन दिलेले आहे.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, या विषयाला अनुसरुन दुसरे म्हणजे आपल्याकडे कर्मचारी दोन-पाच वर्षांनी रिटायर होणार आहेत. अशा लोकांनी आपल्याला या ठिकाणी सेवा दिलेली आहे. ग्रामपंचायतपासून, नगरपरिषदा अगदी महानगरपालिकापर्यंत आता ते रिटायर होतीलच. पण त्यांना जी पदोन्नती बाकी आहे. काही ठिकाणी आपले ए.एम.सी. होणार आहेत. काही ठिकाणी वॉर्ड ऑफिसर होणार आहेत आणि त्यांना पण आपण पदोन्नती दयायची आहे. त्यांच्याकडून लेखी हमी घ्या की, या वर्षात जसे केळकरसाहेबांनी सांगितले की, वर्षभरात आम्ही आमची गुणवत्ता घेउन टाकू असे लेखी त्यांनाही प्रमोशन देउन टाका. त्यांना वेतनश्रेणी लागू करावी असे आपले सिनिअर लोक आहेत. ते आता रिटायर होणार आहेत. त्यांनाही आपल्या गावासाठी किंवा आपल्या गावाच्या स्थानिक लोकांसाठी काहीतरी केले.

**दिनेश नलावडे:-**

सभापती साहेब, या विषयावर तुम्ही जाणीवपूर्वक लक्ष द्या. आता फक्त अकरा कर्मचा-यांना जी आपण पदोन्नती देतो. पण बाकीच्या कर्मचा-यांवर अन्याय होणार नाही, याची खबरदारी घ्या आणि त्यांच्याकडे नियमानुसार जे आपल्याला शिक्षण देतात. त्याचे शिक्षण घेउन त्यांना पदोन्नती द्यावी आणि हा विषय मंजुर झालेला पुढच्या विषयाला सुरुवात करावी.

**रिटा शाह:-**

ठराव काय झाला ते सांगा ना.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त सो.):-**

याच्यानंतर एल.एस.जी.डी. होतील त्या सर्व कर्मचा-यांचा विचार केला जावा.

**आसिफ शेख:-**

मी असा ठराव मांडलेला आहे की, अकरा लोक आहेत. उर्वरित ६५ लोक राहिले आहेत. त्या सर्वांना ही सभा मंजुरी देत आहे, असा ठराव मांडला आहे. अनुमोदन सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी दिलेले आहे. ठराव मंजुर झालेला आहे.

**रिटा शाह:-**

शैक्षणिक पात्रता कम्प्लसरी असेल तर बघा.

**आसिफ शेख:-**

आम्ही आपल्याला ठराव तयार करुन देतो. साहेब, आपके बहाने सबका भला। आपल्याला सगळ्यांचेच भले करायचे आहे आणि आपले नाव तर कल्याण केळकर आहे.

**रिटा शाह:-**

म्हणजे आजची सभा त्यांनाही मंजुरी देते.

**प्रकरण क्र. १९५ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवरील गट ''क'' (वर्ग-३) मधील कर्मचा-यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने असलेली कुंठीतता घालविण्यासंबंधि कालबद्ध पदोन्नती / आश्वासित प्रगती योजना लागू करणे बाबत.

**ठराव क्र. १७६ :-**

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. एस्.आर.व्ही.१०९५/प्र.क्र.१/९५/बारा/दिनांक ८/६/९५ नुसार कर्मचा-यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देऊन कुंठीतता घालविण्यासाठी योजना आहे. उपरोक्त शासन निर्णयामध्ये दि. २९/७/९३, १/११/९५, २०/३/९७, १७/७/९७, १७/७/२००१, ३/८/२००१, १७/५/२००३ नुसार वेळोवेळी परिपत्रकाद्वारे सुधारणा, स्पष्टीकरण करण्यांत आले आहे.

शासन निर्णय दि. ८/६/९५ नुसार महानगरपालिका आस्थापनेवरील कर्मचा-यांना ही योजना लागु करणे पूर्वी पदोन्नतीसाठी विहीत कार्यपध्दती, सेवाजेष्ठता पात्रता, अर्हता परिक्षा, गोपनीय अहवाल

या बाबींची पूर्तता करुन घेतली आहे व पात्र कर्मचाऱ्यांची यादी या सोबत परिशिष्ट ''अ'' प्रमाणे आहे. या कर्मचाऱ्यांचे यादीस पदोन्नती निवड समितीने दि. २२/१२/०३ रोजी बैठक घेऊन शिफारस केली आहे.

शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३ मंत्रालय, मुंबई, दि. २०/७/२००१ नुसार दि. १/८/२००१ पासून आश्वासित प्रगती योजना लागु करुन कालवबध्द योजना बंद करणेंत आली आहे. त्यामुळे ज्या कर्मचाऱ्यांना दि. ३१/७/२००१ पर्यंत सर्व पात्रतेसह १२ वर्ष पूर्ण झाली आहेत. त्यांना कालबध्द पदोन्नती योजना व तद्नंतर (दिनांक १/८/२००१) पासून आश्वासित प्रगती योजना लागू केली आहे. शासन निर्णय दि. ८/६/९५ नुसार कालबध्द योजना लागु करणेस मा. उपसंचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय यांचे कडील दि. १७/७/९७ चे पत्रानुसार कालबध्द पदोन्नतीची वेतनश्रेणी लागु करणेची योजना राबविणेस नगरपरिषद सक्षम असल्याचे कळविले आहे. तसेच नगरपरिषद कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र नागरी सेवा शर्ती नियम सन १९९५ चे ठरावापासून लागु केले आहे. त्यामुळे ही योजना महानगरपालिका कर्मचाऱ्यांना लागु करणेस शिफारस करण्यांत आल्यानुसार तत्कालीन नगरपालिकेत मा. स्थायी समिती सभा दि. १९/६/९८ ठराव क्र. १३० अन्वये कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्याने कुंठीतता घालविण्यासंबंधि योजना लागू करणेंस मंजुरी दिलेली आहे.

तरी सोबतच्या परिशिष्ट ''अ'' मधील अ. क्र. १ ते ९ पात्र कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती योजना व अ. क्र. १० व ११ कर्मचाऱ्यांना आश्वासित प्रगती योजना लागू करणेस तसेच एकाच पदावर सतत १२ वर्षे सेवा करणाऱ्या उर्वरित ६५ कर्मचाऱ्यांना देखील एल.एस.जी.डी.ची पात्रता धारण करणेची मुदत देणेंचे अधिन राहून सदर योजनेअंतर्गत वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी लागू करण्यांस आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१(४) व त्यावरील स्पष्टीकरण नुसार मा. महासभेचे मंजुरीचे अधिन राहून मा. स्थायी समिती मा. महासभेपुढे मंजुरीकरिता शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. आसिफ शेख.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण १९६ चे वाचन केले.)

**धनराज अग्रवाल:-**

सभापती महोदय, अग्निशामक दलासाठी आपण फार महत्वाचे मागच्या वर्षी दोन-तीन सभामध्ये विषय आले होते. आम्ही लाखो रुपयांचे उपकरण घेतलेले आहे. ठराव पास केलेले आहेत. माझी इच्छा आहे की, ते सर्व उपकरण इकडे आले की नाही. याची जरा आम्हाला माहिती दयावी.

**क्लासो फर्नांडीस :-**

गेल्या वेळी जी आपल्याला आर्थिक प्रशासकीय मंजुरी मा.स्थायी समिती सभेने दिली होती. त्यापैकी माझ्याकडे इम्प्लेटेबल लाईट टॉवर, रेस्क्यु टुल्स आणि फ्लोटिंग पंप ही उपकरणे आलेली आहेत. काँक्रीट करण्याचे शिल्लक आहे. त्याच्यापैकी जे उर्वरित आहेत. त्यांना आता टेन्डर नोटिस वगैरे काढून टेन्डर कॉल केले. त्याची पुढील कारवाई भांडारपालांकडे प्रलंबित आहे.

**धनराज अग्रवाल:-**

तुमचे आता किती सामान बाकी आहे.

**क्लासो फर्नांडीस :-**

त्याच्यात मंजुरी दिलेल्यापैकी सात-आठ सामानाचे पुन्हा टेन्डर कॉल केलेले आहेत. त्यातील मोठया सामानापैकी तीन सामान आलेले आहेत. एक प्रलंबित आहे.

**धनराज अग्रवाल:-**

दुसरे सामान केव्हा येणार आहे?

**संजय गोखले :-**

टेन्डर काढून पूर्ण कारवाई करुन आयुक्तांची सही झाल्यावर कार्यादेश देण्यात येईल.

**धनराज अग्रवालः-**

म्हणजे अग्निशामक दलासाठी गाडया वगैरे आहेत. आपल्याकडे वेस्टमध्येच आहे. ईस्टमध्ये याचे काही योजना आहे का? ईस्टमध्ये गाडया ठेवण्याचे किंवा आग लागली कुठेतरी तर तिकडे काही योजना आहे का?

**क्लासो फर्नांडीस :-**

सिल्व्हर पार्कची जी पाण्याची टाकी आहे. तिकडे आम्ही आता प्रपोज केलेले आहे. अग्निशामक स्थानक नवीन बांधायचे म्हणून पुढच्या अर्थसंकल्पात प्रपोज करायला आम्ही दिले आहे.

**धनराज अग्रवालः-**

माझ्या माहितीप्रमाणे जैसल पार्कचा प्लॅन मंजुर झाला तेव्हा त्या बिल्डरशी करार झाला होता की, त्याच्यात अग्निशामक दलासाठी जागा ठेवावी. त्या जागेचे काय झाले?

**क्लासो फर्नांडीस :-**

त्या बाबतीत ह्या नगररचना विभागाला माहिती असेल.

**धनराज अग्रवालः-**

नगररचना विभागाने सांगावे काय झाले? त्यांनी जागा ठेवलेली आहे की नाही ठेवली?

**एस. आर. शेंडे :-**

तपासून सांगतो.

**धनराज अग्रवालः-**

जर जागा ठेवलीच नसेल आणि बिल्डर पळून गेला असेल तर तुम्ही काय करणार?

**एस. आर. शेंडे :-**

तशी जर अट मंजुर झाली असेल तर त्याप्रमाणे त्याच्यावर कारवाई करण्यात यावी.

**धनराज अग्रवालः-**

आपण पूर्ण अहवाल द्यावा. जैसल पार्क योजनातून किती आपली जमीन फायर ब्रिगेडसाठी ठेवलेली आहे ती कुठे आहे? त्याचा संपूर्ण अहवाल पुढच्या सभेत द्या. विषय जाउ द्या. पण त्याचा अहवाल आम्हाला द्या. सभापती महोदय, त्यांना सांगा पुढच्या सभेत अहवाल द्यायला. जमिनीचे काय झाले? ती आहे की गेली.

**दिनेश नलावडेः-**

सभापती महोदय, हा जो १९६ चा विषय आलेला आहे. भाईंदर(पश्चिम)ला फायर ब्रिगेडचे ऑफिस आहे. परंतु, भाईंदर पूर्वेला अचानक प्रकार घडेल त्यावेळेस तिकडेदेखील अगोदर फायर ब्रिगेड उभे रहायचे. परंतु, आता तिकडे नाहीच आहे. टाकीकडे तिकडे कुठेही उभे राहतात. सगळी वाहने वेस्टलाच आहेत. तर मी म्हणतो आपल्याकडे जागा आहे. खारीगाव स्मशानभूमी तिकडे जागा आहे. तिकडे जरी उभे राहिले तर आम्हाला तिकडे अडचण येणार नाही. भाईंदर पूर्वेला फाटकावर पण चालू शकेल.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त साो.):-**

फाटकाजवळही पूर्वीसारखे उभे करा.

**धनराज अग्रवालः-**

साहेब, आपल्याकडे जैसल पार्कला जागा असली पाहिजे. ती तुम्ही बघा ना कुठे जागा आहे? त्याचा शोध तर लावा. टाकीकडे जागा आहे. तिथे उभे करा. म्हणजे जैसल पार्कची जागा सोडून द्या. अहवाल पुढच्या सभेत देणार का?

**रिटा शाहः-**

साहेब, हा विषय मंजुरच आहे. माझी फक्त एक सुचना आहे की, आपण जे डायरेक्ट कंपनीला सांगितले आहे. त्याचे काही तात्पर्य आहे का? नाही तर त्याची निविदा काढा.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त साो.):-**

कंपनीकडून खरेदी केले तर आपल्याला फायदा होईल. कारण की, आपण आता गाडया घेतल्या सुरुवातीला टेन्डर मागविले होते. हिन्दुस्थान कंपनीकडून आपण ज्या कार घेतल्या. त्यामध्ये आपल्याला जवळजवळ एक लाखाच्या जवळपास आर्थिक फायदा झाला.

**आसिफ शेखः-**

त्या गाडया घेतल्या त्या बिघडल्या. गाडया चेन्ज केल्या पण नवीन आल्यावर चालतच नाही. महापौरांबरोबर कार्यक्रमाला आम्ही जात असतो. तेव्हा त्या गाडयांची हालत बघा काय होते? तो आपण गंभीरतेने विचारच करीत नाही.

**दिनेश नलावडे:-**

सभापती महोदय, १९६ चे जे प्रकरण आपल्याकडे वाहन खरेदीसाठीचे आलेले आहे. त्यासाठी हे सभागृह मंजुरी देत आहे, असा मी ठराव मांडतो.

**याकुब कुरेशी:-**

याला माझे अनुमोदन आहे.

**रिटा शाह:-**

माझी सुचना आहे की, इन्क्ल्युड करा. त्यांचे टेन्डर कॉल करा. सचिव साहेब, सदर विषयामध्ये टेन्डर कॉल करायचा. निविदा मागवायची अशी मंजुरी देत आहे.

**मा.सभापती:-**

तुम्हाला ते चांगले उत्तर असेल तर दया.

**कल्याण केळकर (मा.उपआयुक्त साो.):-**

देउन टाकू.

**मा. सभापती:-**

कुठले चांगले? डायरेक्ट कंपनीला मागवून चांगले का?

**याकुब कुरेशी:-**

डायरेक्ट कंपनीकडून मागवून आपला फायदा होत असेल तर सन्मा.सदस्या रिटा शाह टेन्डर मागविण्याची आवश्यकता नाही. उसमे अपना फायदा होता है। और उसके लिए हम लोग टेन्डर कॉल करेंगे तो इसमे दलाल लोग आते है। उसकी दलाली लग जाती है।

**रिटा शाह:-**

इधर से या उधर से आये। कमिशन तो देनाही पडेगा।

**याकुब कुरेशी:-**

आता जे १९६ विषयाला सन्मा. सदस्य दिनेश नलावडे यांनी सुचित केले. त्याला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. १९६ :-**

अग्निशमन दलाकरिता नवीन टाटा २०७ डी.आय. वाहन खरेदी करणेंस मंजुरी देणे.

**ठराव क्र. १७७ :-**

अग्निशमन दल हे अत्यावश्यक सेवा असून चोवीस तास कार्यरत असते. अग्निशमन दला करिता नविन साहित्य खरेदी केलेले आहे. सदरचे साहित्य घटनास्थळी वाहून नेण्यासाठी अग्निशमन दलाकडे लहान वाहन नाही. सदर बाबतीत टाटाचे २०७ डी.आय. हे वाहन उपयुक्त ठरेल. सदरचे वाहनात ७ x ५'' एच'' आकाराचा सामान वाहून नेण्यासाठी ट्रे उपलब्ध आहे. सदर वाहनात रेस्क्यु टुल्स, पोर्टेबल पंप, प्लोटींग पंप, कॉंक्रीट कटर, सॉ कटर व इतर आवश्यक साहित्य वाहून नेण्यांस मदत होईल. तसेच वाहन लहान असल्याने लहान गल्लीत ही उपयोग ठरेल.

सदर कामी नविन वाहन खरेदी करिता अंदाजपत्रकात सन २००३-२००४ साला करिता रु. २५,००,०००/- एवढी तरतुद केली असून त्यातून ''मिनी फायर'' टेंडर करिता अंदाजे रु. १४,००,०००/- खर्च वजा जाता रु. ११,००,०००/- इतकी तरतुद उपलब्ध आहे. वरील वाहनांचे अंदाजे रु. ४,५०,०००/- (जकात करा व्यतिरिक्त) इतकी किंमत आहे.

तरी अग्निशमन दलाकरिता नविन टाटा २०७ डी.आय. वाहन उत्पादक कंपनी कडून शासकीय दराने खरेदी करणेंस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ नुसार ही सभा मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. याकुब कुरेशी.**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९७ चे वाचन केले.)

**जोजफ घोन्सालवीस :-**

सभापती साहेब, या विषयाच्या अनुषंगानेच बोलतो. आता जी औषधाची मागणी आहे, आरोग्य केन्द्र वगैरे. अजूनपर्यंत मच्छर एवढे झाले. म्हणजे आरोग्याचाच विषय आहे म्हणून बोलतो. एवढी मच्छर झाली आहे. औषधे वगैरे मारतात की नाही, ते कळत नाही आणि मारतात तर मग ते मरत का नाही? ते काही कळत नाही. ते जे कॉन्ट्रॅक्टर लोकांना जे साफसफाईचे कॉन्ट्रॅक्ट देतो, त्यांच्याकडे गाड्या नाहीत. त्यांच्याकडे झाडू नाही. हे सगळे काय चालले आहे. त्यांना इकडे बोलवा. आम्हाला त्याचे स्पष्टीकरण पाहिजे.

**याकुब कुरेशी:-**

आताच सन्मा. सदस्यांनी मांडलेला प्रश्न खरोखरच गंभीर आहे. ॲक्चुली पूर्वी एवढया मोठया प्रमाणात औषधे न मारता मच्छरांचा एवढा त्रास नव्हता. परंतु, आता एवढे औषध आणि आपण एवढा खर्च करुनसुध्दा मच्छर वाढली आहे. हे मच्छर मारण्याचे औषध मारतात की, मच्छर वाढविण्याचे औषध मारतात. तेच कळायला मार्ग नाही. प्रमाण अतिशय वाढलेले आहे.

**रिटा शाह:-**

सभापती साहेब, हा विषय सुरु करताना मच्छर वाढली आहे. ते मला मान्य आहे. कारण आताच विषय चालला होता की, त्यांना आपण उलट मच्छर कमी करण्याचे औषध पाजतो की, त्यांना स्ट्राँग बनविण्यासाठी आणि अजून जास्त मच्छर पैदा करण्यासाठी आपण त्यांना औषध पाजतो. असा विषय झालेला आहे. पण हा विषय सुरु करताना मी एक प्रश्न विचारते की, डॉक्टर बावीस्कर यांची आपण जी मुदतवाढ पाच महिन्याची दिली होती. ती संपली आहे की, अजून बाकी आहे. त्याचा जबाब आस्थापना डिपार्टमेन्टच्या मोरेसाहेबांनी दयायचा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

फाईल बघायला लागेल.

**रिटा शाह:-**

आज जो हा विषय आपल्याकडे आलेला आहे. त्यांच्या हिशेबाने आला. त्यांची मुदतवाढ संपली असेल तर ते कसे घेणार?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

सन्मा. सदस्या रिटा शाह आपण जो प्रश्न उपस्थित केला. हा त्यांच्या मुदतवाढीशी संबंधित विषय नाही आहे. जो विषय सभागृहासमोर आहे. सभागृहाच्या पटलावर आहे. तो आरोग्य केन्द्र उभारणे कारण की, आतापर्यंत सातत्याने आपल्या नागरिकांची मागणी होती की, स्थानिक नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध नाहीत. तर त्यासाठी आरोग्य केन्द्र उभारायचे आहे. त्यासंबंधी आपल्याला चर्चा करायची आहे.

**रिटा शाह:-**

टिपणी कोणी तयार केली?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

मा. आयुक्त साहेबांचा गोषवारा आहे. याच्यावर आयुक्तसाहेबांची सही आहे.

**रिटा शाह:-**

ते ठिक आहे. पण मला एवढेच सांगा. डॉ. बावीस्कर यांची मुदत पूर्ण झालेली आहे की, बाकी आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

ती आपल्याला बघावी लागेल.

**रिटा शाह:-**

आस्थापनेवरचे मोरे साहेब आहेत. त्यांना विचारा.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

ती फाईल बघावी लागेल.

**रिटा शाह:-**

कार्पोरेशनच्या बाहेर फाईल नाही. ती फाईल आपल्याकडेच आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

ती आता आणावी लागेल.

**रिटा शाहः-**

मग मोरे साहेब कुठे गेले?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

तो आपला विषयच नाही. आपल्याला प्राथमिक आरोग्य केन्द्र सुरु करावयाचे आहे. त्यासाठी लागणाऱ्या करार पध्दतीने अधिकारी नेमायचे आहे.

**आसिफ शेखः-**

प्रकरण क्र. १९७ महानगरपालिका हद्दीत सुरु करावयाच्या आरोग्य केन्द्रासाठी लागणाऱ्या औषधे खरेदीसाठी मागविलेल्या निविदा मंजुरी देण्याबाबत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

माझ्या प्रश्नाचे त्यांना उत्तर देउ दे. नंतर ते ठराव पास करा.

**आसिफ शेखः-**

ते सगळे एकत्र उत्तर देतील.

**जोजफ घोन्सालवीस :-**

पहिले त्याच्यावर उपाययोजना सांगा. त्या कॉन्ट्रॅक्टरना इकडे बोलवा. कामगार आहेत तर गाडया नाहीत. गाडया आहेत तर चाक नाही.

**आसिफ शेखः-**

तो तुमचा विषय आहे. मी अजून विषय वाचला नाही.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्यांना पहिले उत्तर देवू दे. काय चालले आहे? तुम्ही आता ठराव करु नका.

**आसिफ शेखः-**

ठराव करीत नाही. एवढया लवकर ठराव करणारच नाही. चर्चा करुनच ठराव करणार आणि ठराव करणार तर योग्यच करणार. महापालिका हददीत सुरु करायच्या आरोग्य केन्द्रासाठी लागणा-या औषध खरेदीसाठी मागविलेल्या निविदास मंजुरी देण्याबददल विषय आजच्या विषयपटलावर आहे. तर आपल्याला या ठिकाणी पाच विभाग दिलेले आहे आणि आरोग्य केन्द्राची संख्या सात आहे आणि आपल्याला पाच विविध ठिकाणी चालू करायची आहेत. या ठिकाणी या विषयाला अनुसरुन जे मुददे मच्छर संबंधात आहेत. तर त्या सदस्यांच्या भावनाशी आम्ही सर्व सहमत आहोत. संपूर्ण सभागृह सहमत आहे. मच्छरचे प्रमाण फारच वाढलेले आहे. त्यात कोणाचे दुमत नाही. मच्छराचे शास्त्रशुध्द पध्दत डॉ. बावीस्कर साहेबांनी महासभेत पण सांगितली आहे आणि स्थायी समितीमध्ये मागे सांगितले की, आपण हयाचे संपूर्ण जे डास असतात. डासांच्या अळया पण कशा नष्ट होतील. त्यावेळी त्यांनी एक प्रस्ताव उपआयुक्त अतिक्रमण यांच्याकडे जेव्हा आरोग्य विभागाचा तेव्हा चार्ज होता. तेव्हा मला वाटते बायर इंडिया या कंपनीकडून लोक येणार होते आणि ते बी.ओ.टी. तत्वावर अगोदर काम करणार होते आणि आपल्या कर्मचा-यांना पण त्यामुळे ते ट्रेन करणार होते आणि ते फ्री करुन दयायची आणि संपूर्ण जो आहे. त्या पध्दतीने व्यवस्थित झाले असते. परंतु, नंतर ते झाले नाही आणि शास्त्रशुध्द पध्दती अवलंबिली तरीदेखील मच्छरांचा प्रार्दुभाव एवढा वाढलेला आहे. मच्छर एवढे वाढलेले आहेत की, लोक रात्रभर हैराण झाले. झोपच येत नाही. त्यामुळे या ठिकाणी तो जरी विषय नसला तरी आरोग्य सुविधा प्रामुख्याने नागरिकांना उपलब्ध करुन देणे हे कायदेशीर आपल्याला बंधनकारक आहे, तो घटनात्मक अधिकार आहे. तर आमच्या प्रभागात विशेषतः कारण हा संपूर्ण प्रभाग भाईंदर (पूर्व), भाईंदर (पश्चिम), उत्तन, मिरा रोड आणि काशिमिरा या पाच विभागात एकूण सात आरोग्य केन्द्रे उभारणार आहोत. लोकांना आरोग्य विषयक सुविधा देण्यासाठी ज्या आपल्या काही औषध खरेदी आहे. तर औषध खरेदी करणेकामी आपण वीस लाखाची या ठिकाणी तरतुद केलेली आहे. तरी तेवढा खर्च हा या ठिकाणी अपेक्षित आहे. तातडीने हे काम आपण करुन घ्यायला पाहिजे. त्यात कोणाचेही दुमत रहाणार नाही. परंतु, या ठिकाणी मी एक सभागृहाच्या निदर्शनास एक गोष्ट आणून देउ इच्छितो की, आपले जे आरोग्य विभागाशी निगडित आहे. कालच एक घटना काशिमिरा रोडला घडली. एका इब्राहिम टॉवरमध्ये रहाणारा मुलगा मोटार सायकल चालविताना अपघात झाला व एस.टी.ची धडक झाली व तो जागीच ठार झाला. मी फोन केला. महापालिकेत तर त्यांना शववाहिका दया. तरी उत्तर मिळाले की, शववाहिनी जी आहे ती गॅरेजमध्ये आहे. शववाहिनी ही आरोग्य विभागात असते किंवा नाही. तरी ती कोणाच्याकडे असते. रुग्णवाहिकेचासुध्दा असाच प्रकार झाला की, शववाहिनी पाहिजे होती तेव्हा त्याचे काही क्लच वगैरे तुटले आहेत. म्हणून की गॅरेजमध्ये आहे. प्रत्येक वेळी आम्ही या ठिकाणी सर्व सदस्य गांभीर्याने व शहराच्या विकासाच्या दृष्टिकोनातून सर्व

प्रकारच्या मंजुऱ्या देतो. आम्ही एकमताने व एक दिलाने या ठिकाणी देत असतो. या ठिकाणी घेत असतो. परंतु, कामाची जी पध्दत आहे. तर काम चुकीच्या पध्दतीने चाललेले आहे. प्रत्येक वेळी बोलतो ग्रामपंचायतपासून जी पध्दत आता पुढे चालू आहे. काहीतरी परिवर्तन झाले पाहिजे. खुर्च्या वाढल्या, केबीन वाढले, पगार वाढले, नवीन नवीन आस्थापनाचे कर्मचारी येतात, अधिकारी येतात. कामाची पध्दत सुधारलेली दिसत नाही. अजिबात दिसत नाही. म्हणजे अगोदर जे डिपार्टमेन्ट ग्रामपंचायतीच्यावेळी होते. एक माणूस सांभाळायचा. आता पण तसेच चालले आहे. फक्त काय पसारा वाढत गेला. बाकी काही नाही. सुधारणा जी व्हायला पाहिजे. लोकांचे कार्य अपेक्षित दिसले पाहिजे. ते दिसतच नाही असे कसे चालले आहे? काहीतरी सुधारणा करा. याच्यावर काहीतरी खुलासा करा.

**मिलन म्हात्रे:-**

जवळजवळ १५ दिवसापूर्वी आपली शववाहिनी बाहेर गेली असताना ॲक्स्डिन्ट झाले आणि ती गाडी इथे आणून ठेवली. त्यानंतर ती जी गाडी गॅरेजला गेली. त्यानंतर त्याच्या तीन शिफ्टमध्ये ड्रायव्हर हे आजमितीस आपल्या आस्थापनेवर बसून आहेत. हा झाला ड्रायव्हर उपलब्धतेचा विषय आणि एक ॲम्ब्युलन्स केवळ बॅटरी नाही म्हणून आपल्याकडे खाली धुळ खात बसली आहे. त्याचे इन्कम गेले. त्या दिवशी एक आठवडयापूर्वी मी वाहनचालकाच्या कक्षात सकाळी आठला आलो. आठ ते पावणे नउ वाजेपर्यंत एकही वाहनचालक उपलब्ध नव्हता. आपल्या वाहनचालकाच्या खालच्या कक्षामधील ही गत आहे. म्हणजे ॲम्ब्युलन्सचे तुमचे तीन ड्रायव्हर आहेत. ते आस्थापनेला आता पगार घेत आहेत. ह्याच्याबददल केळकरसाहेबांशी माझी चर्चा झाली. केळकरसाहेब बोलले ॲम्ब्युलन्स लगेच चालू करुन देतो. पण अजून त्या ॲम्ब्युलन्सना बॅटरी लावली नाही आणि ॲम्ब्युलन्स कार्यरत सुध्दा नाही आहे. परिणामी या शहरातील लोकांना ॲम्ब्युलन्स उपलब्ध नाही आणि कारण काय दिले आहे? वाहनचालक नाही आहेत. पण खरे म्हणजे त्याला बॅटरीच नाही आहे.

**आसिफ शेख:-**

एका गोष्टीचा खुलासा व्हायला पाहिजे की, ॲम्ब्युलन्स आणि शववाहिनी हे आरोग्य विभागाकडे आहेत की नाही? कोणत्या विभागाकडे आहेत.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.):-**

गेल्या आठ दिवसापूर्वी शववाहिका एक प्रेताला घेउन शेगावला जाणार होती आणि रस्त्यामध्येच त्या गाडीचे ॲक्सिडंट झाले आणि शववाहिका तेव्हापासून बंद आहे.

**आसिफ शेख:-**

जरी ती शववाहिनी त्या मृताला घेउन शेगावला जात होती आणि अपघात झाला. या गोष्टी जरी खऱ्या असल्या तरी आपल्याकडे पर्यायी व्यवस्था पाहिजे की नाही? दुसरी एक ॲडीशनल गाडी पाहिजे. आपण तिथे व्यवस्थित करायला पाहिजे ना. दोन गाडया तुम्ही घ्या. एखाद वेळी अपघात झाला काय झाले? तर दुसरी ॲडीशनल गाडी पाहिजे ना.

**मिलन म्हात्रे:-**

तुमच्याकडे स्टँड बाय बॅटऱ्या आहेत की नाहीत. मागे जसे आम्ही लोक गेले असताना धक्का मारून गाडी स्टार्ट करायला लागली. तुमच्याकडे नवीन बॅटऱ्या तुम्ही ठेवता की नाही. मागे एकदा असेच झाले. ती तुमची वॅक्युमप्रेशरची जी गाडी आहे. ती टेम्बावर नेली. त्याची बॅटरी त्या ॲम्ब्युलन्सला चढविली ती ॲम्ब्युलन्स येथे आणली आणि मग ड्रायव्हरने ती गाडी चालू केली. काय चालले आहे ते मला कळत नाही. कारण असे दिले आहे की, ड्रायव्हर नाही. तुमच्याकडे तीन ड्रायव्हर उपलब्ध आहेत. मग शववाहिनीचे ड्रायव्हर कुठे गेले. ड्रायव्हर उपलब्ध आहेत तर ॲम्ब्युलन्स अजूनही खाली धूळ खात पडलेली आहे आणि तुम्हाला तक्रार करुन एक आठवडा झाला आहे. तुमच्या आदेशाचे पालन होत नाही.

**मा. सभापती:-**

उपआयुक्त साहेब, तातडीने माहिती घेउन कार्यवाही करा.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त सो.):-**

तातडीने प्रभाग विभागाकरिता डिक्लर करतो. या कामासाठी मी एका व्यक्तीला नियुक्त केले आहे. तो श्री. बोनी त्याला मी आजच्या आज निलंबित करण्याचे आदेश सभागृहासमोर देतो. कारण की, त्याचे काम आहे. प्रत्येक वाहन सुरु आहे किंवा नाही. ती जर आजच्या आज वाहने चालू झाली नाहीत तर श्री. बोनीला निलंबित करण्याचे आदेश मा. आयुक्त साहेब यांच्यासमोर ठेवावे.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे ॲम्बेसिडर गाड्या आहेत. त्याचे टायर्स, ट्युब हे आपल्याला स्टँडबाय ठेवायला पाहिजेत.

**आसिफ शेख:-**

सभापती साहेब, महत्वाचा विषय असा की, आपल्याकडच्या शववाहीनीका, रुग्णवाहिका हया दोन्हा कोणत्या खात्याकडे आहेत. आरोग्य विभागाकडे आहे का कोणत्या अन्य विभागाकडे आहेत. हयाचा खुलासा आपण अगोदर करा.

**संजय गोखले:-**

वाहन विभागाकडे आहे.

**आसिफ शेख:-**

तुम्ही त्यांच्याकडे वर्ग का करत नाही. वाहन विभागामध्ये दुरुस्ती देखभाल तुमच्याकडे आहे. तुम्ही ते बघायला पाहिजे. तुम्ही त्यांच्या ताब्यात का देत नाही. आरोग्य विभागाच्या ताब्यात का देत नाही. शववाहिनी आणि रुग्णवाहिका त्याचप्रमाणे जन्म-मृत्यू हा जो विभाग आहे. ते सर्व आरोग्य विभागाशी निगडित आहे. मग ज्या गोष्टी ज्याच्याशी निगडित आहेत. ज्या खात्याशी निगडित आहेत. त्या खात्याकडे तुम्ही ते वर्ग करायला पाहिजे, स्टाफसहित. सभापती साहेब, हयाच्यात काहीतरी परिवर्तन दिसले पाहिजे. या गोष्टी प्रशासनाने केल्या पाहिजे, आम्ही नाही. आम्ही तुमच्या निदर्शनास आणून देणार आणि तुम्ही नंतर करणार.

**मिलन म्हात्रे:-**

केळकर साहेब, एक शववाहिनी त्याचे तीन ड्रायव्हर, तीन क्लिनर त्याच्यानंतर दोन ॲम्ब्युलन्स आहेत. त्याचे तीन ड्रायव्हर, तीन क्लिनर म्हणजे सहा ड्रायव्हर. हा जो तुमचा व्हेइकलचा स्टाफ आहे. तो तुम्हाला आरोग्य खात्याकडे वर्ग करावा लागेल आणि त्या गाडयांच्या नंबरसहीत त्या गाडयांची जी हिस्ट्री शिट आहे. त्या हिस्ट्री शिटमध्ये ह्या सगळया नोंदी घ्या आणि त्यांना तसे ते वर्ग करा.

**कल्याण केळकर(मा.उपआयुक्त साो.):-**

सन्मा. सभागृह यामध्ये वाहन विभाग कशासाठी आहे. तर सर्व नगरपालिकेची वाहने ही वाहन विभागाच्या अंडर कन्ट्रोलमध्ये येतात. हयाचा अर्थ हा नाही की, आरोग्य विभागाला वाहन दिली म्हणजे आरोग्य विभागाने सर्व करावे. यासाठी वाहन विभागाकडे त्यांनी रिपोर्ट दयायचा असतो की, आमचे वाहन अमुक तारखेला बंद झालेले आहे. त्याची बॅटरी खराब झालेली आहे. अशा त-हेचे आमच्याकडे अहवाल उपलब्ध होत नाही. त्यामुळे कार्यवाही करणे शक्य नसते आणि तशा त-हेचे अहवाल येण्याकरिता आम्ही गेल्या काही महिन्यापूर्वी एक आदेश काढला होता व श्री. बोनी याला अशा त-हेचे सर्व अधिकार आम्ही दिले होते की, सर्व वाहनांची खात्री करावी आणि रोजच्या रोज खात्री केल्यानंतर त्या वाहनांवर संपूर्ण नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविली होती आणि म्हणून मी सभागृहासमोर आज सादर करतो की, त्यांनी त्याच्या कामासाठी कुचराई केली. त्याची गंभीर दखल घेउन मी आयुक्त साहेबांकडे त्याला निलंबित करण्याचा प्रस्ताव सादर करतो.

**मिलन म्हात्रे:-**

ते डिपार्टमेन्ट आम्हाला सांगतात की, आमच्याकडे ॲम्ब्युलन्स, शववाहिनी नाही असे आम्हाला कळविण्यात आले.

**आसिफ शेख:-**

आपण हया ठिकाणी जो खुलासा केला की, वाहन विभाग संपूर्ण आहे. संपूर्ण डिपार्टमेन्टच्या वाहनाची देखभाल, दुरुस्ती बघतात. ते योग्य आहे. एखादया वेळी तुम्ही बांधकाम विभागाला किंवा टाउन प्लॅनिंग विभागाला जर वाहन दिले नाही तर चालू शकेल. पर्यायी व्यवस्था ते स्वतः करु शकतात. तेवढे ते सक्षम आहेत. कारण त्यांच्या विभागात चांगली चांगली लोक असतात. परंतु, आरोग्याच्या संदर्भातील विषय आहे. तेवढाच विषय मी बोललो इतर विभागाचे बोललो का? आरोग्याचा विषय नागरिकांच्या हिताच्या, आरोग्याच्या दृष्टिने महत्वाचा आहे. म्हणून हे जन्म-मृत्यू विभाग, शववाहिनी आणि रुग्णवाहिनीका हे तुम्ही आरोग्य खात्याकडे वर्ग करा आणि त्यामुळे काही जबाबदारी तुम्हाला निश्चित करण्यात येईल. ते काम करतात किंवा नाही. आता काय होत आहे. जो तो आपली जबाबदारी दुस-यावर ढकलून मोकळे होत आहे. ते आमचे काम नाही. आरोग्याचे काम आहे आणि आरोग्य विभागाला विचारले तर ते सांगतात आमचे काम नाही ते वाहन विभागाचे काम आहे. असे एकमेकांवर जबाबदारी ढकलून मोकळे. नर वा कुंज. कोणाला पण काहीपण करा.

साहेब मी जे बोलतो त्याच्या मागची भावना समजा. आरोग्य विभाग हा अत्यंत महत्वाचा विभाग आहे. लोकांच्या आरोग्याशी निगडित आहे आणि म्हणून त्यांना ते शववाहिनी, रुग्णवाहिनीका, जन्म-मृत्यू त्यांच्याकडे वर्ग करा. बघा मग काम व्यवस्थित होते का नाही अन्यथा आणखीन दोघाना तुम्ही कामाला लावा. काम निश्चित करता येईल म्हणून तुम्ही आता निर्णय देउन टाका.

**याकुब कुरेशी:-**

सभापती साहेब, आपल्याकडे कायमस्वरुपी वाहनचालक किती आहेत आणि तात्पुरते वाहनचालक किती आहेत. हयाची यादी तयार करा आणि पुढच्या सभेत दया. मी मागच्या सभेत बोललो होतो की, ही गाडीची जी जबाबदारी आहे. ही ड्रायव्हरवर असते संपूर्णपणे आणि ड्रायव्हर जिथे नोकरी करतो. ज्याच्यावर जगतो, जिथे आपल्याला दोन पैसे मिळतात व आपले पूर्ण घर चालते. अशा नोकरीवर लक्ष न देता त्या गाडयांचे हाल करतात आणि गाडया कशाप्रकारच्या वापरतात याचा जाब आपण विचारु शकत नाही. पहिली गोष्ट म्हणजे श्री. बॉनी हा कोण आहे? कर्मचारी. त्याची काय जबाबदारी आहे. तो भाग वेगळा येतो. परंतु, माझ्या माहितीप्रमाणे ही जी ड्रायव्हिंगची जबाबदारी आहे. जे ड्रायव्हर कायमस्वरुपी आहेत आणि आपल्या गाडया मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या गाडया त्यांच्या हातातच दयाव्या आणि ती जबाबदारी संपूर्ण त्यांच्यावर लादावी. त्या गाडीमध्ये जरी काही नुकसान झाले तर तुझ्यावर कार्यवाही केली जाईल. अशा प्रकारे त्याच्यावर एक बंधन ठेवू म्हणजे त्याला कुठेतरी भिती राहिल. आपला ड्रायव्हर कधी गाडी खाली वाकून बघत नाही की, गाडीमध्ये ऑईल किती आहे, पाणी किती आहे, टायरची काय परिस्थिती आहे. हे कधी चुकूनसुध्दा बघत नाही. मागच्यावेळी मी पाणी समितीचा सभापती असताना पाण्याच्या टँकरचा संपूर्ण हेल्पर पाटा ज्याला बोलतात, ज्याच्यवर गाडीचे वजन सांभाळले जाते. हा अख्खा सेट पडला. तरी त्या ड्रायव्हरला माहिती नाही. प्रश्न विचारला तर मला महित नाही मी टेम्परारी आहे असे उत्तर दिले. म्हणून सर्वप्रथम आपल्या जेवढ्या गाडया आहेत, त्याच्यावर आपण एवढे कर्मचारी भरती केलेले आहेत. त्यांना त्याच्यामध्ये परमनन्ट ड्रायव्हर आपले जे आहेत महानगरपालिकेचे त्यांची तिथे नेमणूक करावी आणि त्यांच्यावर जबाबदारी टाकावी. अशी मी विनंती करतो.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, ह्या विषयावर जे सन्मा. सदस्य याकुब कुरेशी ह्यांनी सांगितले तो जो ॲम्ब्युलन्सचा विषय होता. सचिव साहेबांना ही गोष्ट चांगली माहिती आहे. आता जे ड्रायव्हर लोकांचा त्यांनी उल्लेख केला. परंतु कसे होते ते मी तुम्हाला सांगतो. आपल्या येथे बाबुराव वाघ नावाचा कर्मचारी वाहन विभागावरती होता. ड्रायव्हरने त्याचा रितसर अहवाल लेखी स्वरूपामध्ये ॲम्ब्युलन्स बिघडल्याबरोबर वाहन विभागाला कळविले. वाहन विभागाने त्याच्यावर बारा दिवस काहीच कार्यवाही केली नाही. ती तशीच पडून होती आणि त्याच्यावर मी कम्पलेंट दिल्यानंतर त्याने उलट माझ्यावर कम्पलेंट केली. एक रिव्हेंज काढण्याकरिता, काही राजकीय लोकांची देखील त्याला साथ होती. पण काय काही टिकले नाही. माझ्यावर खोट्या तक्रारी केल्या सर्व काय केले. त्याला पुरुन उरली आणि पुढेपण पुरू. पण त्या वाहनविभागाच्या महत्त्वाच्या अधिका-याने ड्रायव्हरचे रिपोर्ट येउन सुद्धा काही केले नव्हते. परिणामी जवळ जवळ बारा ते पंधरा दिवस ती ॲम्ब्युलन्स बंद होती आणि त्या कर्मचा-यावर अजूनपर्यंत त्या प्रकरणात काहीच कार्यवाही झालेली नाही. तक्रारी झाल्या, सर्व काय ते झाले पण कार्यवाही काहीच नाही. त्यामुळे हे असे प्रकार वारंवार घडत आहेत. हे जर त्यावेळेला बाबुराव वाघ या विभाग प्रमुखावर प्रशासनाने कार्यवाही केली असती तर आज हा दिवस बघायला मिळाला नसता. ड्रायव्हरने रिपोर्ट सादर केले म्हणजे ते पण बघा की, ड्रायव्हरने किती रिपोर्ट सादर केले आहेत आणि त्याच्यावर किती कार्यवाही झालेली आहे. आतापर्यंत तुमच्याकडे कुठच्या कुठच्या ड्रायव्हरने वाहन विभागाला रिपोर्ट दिलेला आहे ते काढा. मागवा त्यांच्याकडून, किती तुम्हाला काय काय टाकण्यासाठी दिले आहे. कारण ड्रायव्हर बोलतात आम्ही लिहून देतो पण आम्हाला काही मिळत नाही. ह्याचा जरा खुलासा वाहन विभागाकडून करून घ्यावा. वाहन विभागावर कोण आहे?

**संजय गोखले :-**

मी आहे. पण आता श्री. दोंदे हे कामकाज पाहणार आहेत.

**आसिफ शेख :-**

ही अशी ढकलाढकली होते. ती ढकलाढकली करू नये म्हणून जबाबदारी निश्चित करा. सन्मा. सदस्य याकुब कुरेशी साहेबांनी सांगितले की, तिथे परमनन्ट कर्मचारी नेमा. अन्य विभागात देखील आपण बघा परमनन्ट कर्मचा-यांना जबाबदारी देउन टाका. टेम्पररी लोकांना देऊच नका.

त्यांना दुसरी कामे द्या म्हणजे जबाबदारी निश्चित करता येईल, त्यांना जबाबदार धरता येईल आणि व्यवस्थितपणे आपले प्रशासन चालेल.

**मा. सभापती :-**

कार्यालयीन उपआयुक्त केळकर साहेब ह्यांनी याबाबत तातडीने माहिती घेउन वाहन विभागात सुधारणा करून घेण्यात यावी असा मी आदेश देत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

जे उल्लंघन करतील त्यांच्यावर कार्यवाही करा.

**मा. सभापती :-**

तसेच जे उल्लंघन करतील त्यांच्यावर कार्यवाही करावी असा मी आदेश देत आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मच्छरांच्या बाबतीत माहिती द्या.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, महानगरपालिकेच्या काही विभागात डासांचे प्रमाण वाढलेले आहे. हे मी स्वतः बघितलेले आहे. डासांवर नियंत्रण आणण्यासाठी गटारांची साफसफाई आणि आपले नाले जे वर्षातुन एकदा साफ होतात त्याची पुन्हा साफसफाई हाती घेण्यात आलेली आहे. गटारांची नियमित साफसफाई आठवड्यातून एकदा व्हावी याकरिता स्वच्छता निरीक्षकांचा कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. त्याची मी सुद्धा पाहणी करायला आता सुरूवात केलेली आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

मच्छर मरतात का? आणि आपण साफसफाईचे बोलता तर कर्मचाऱ्यांकडे झाडू नाही, साहित्य नाही.

**डॉ. बावस्कर :-**

आज हा विषय नसल्यामुळे मला पुर्ण आज निवेदन करता येणार नाही. पुर्ण माहिती देता येणार नाही. मी आपल्या विभागामध्ये उद्या सकाळी भेट देतो. आपल्याबरोबर राउंड घेतो. आपल्या सगळया गोष्टींची खातरजमा करून घेउ या आणि औषधाबद्दल जर किटकनाशके, अळीनाशकांबद्दल जर आपली तक्रार असल तर आपली फवारणी चालू आहे तर त्याची खातरजमा औषध उपयुक्त आहेत किंवा नाहीत, त्याची खातरजमा करून घेउ.

**शरद पाटील :-**

फवारणी रोज होते. पण मच्छर मरतच नाही.

**धनराज अग्रवाल :-**

डॉक्टर साहेब, दोन-तीनदा विषय आला आणि आपण जे पहिल्यांदा औषध वापरत होतो ते औषध निम्म कोटीचे होते असे आपण सांगितले. नंतर आपण चांगली उच्च कोटीचे औषध आणले. त्यावेळी तुम्ही आम्हाला सांगितले की, एवढा इफेक्ट होणार आहे की, आपल्या येथील मच्छर नाहीसे होणार आहेत आणि त्याच्यात वेगळी पद्धती आपण आणणार आहोत. पण आता वर्ष होत आला तरी वेगळी पद्धती काय होत नाही. ते असेच चालू आहे आणि मच्छर अजून वाढत आहेत.

**शरद पाटील :-**

आमची आता एक सभा होती आणि तिथे भरपूर मच्छर होते.

**डॉ. बावस्कर :-**

वेगळ्या पद्धतीने आपण काम सुरू केलेले आहे. याचे अनालेसेस सुद्धा करून घेतलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

पुन्हा केव्हा सुरू करणार आहात ते आपण आम्हाला सांगा.

**डॉ. बावस्कर :-**

पुढच्या पंधरा दिवसावर आपण ह्याच्यावर नियंत्रण आणू शकू.

**धनराज अग्रवाल :-**

आपण मागच्या वेळेलापण असेच सांगत होता की, पंधरा दिवसात, महिना भरात आपण मच्छरांचा नाश करू.

**डॉ. बावस्कर :-**

आपण संपुर्णपणे मच्छरांचा नाश करू शकत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही काय सांगितले की, आपण प्रत्येक विभागामध्ये एक टाईम फवारणी करू आणि मच्छर कमी होणार असे नव्वद टक्के, ऐंशी टक्के. पण आता तसे अजून होत नाही. आपण कर्मचारी वाढवले आहेत. जेवढे आपण औषध आणायचे आहे तेवढे औषध आणले आहे.

**शरद पाटील :-**

आम्ही तुम्हाला कधीही विरोध केलेला नाही आहे.

**डॉ. बावस्कर :-**

पुढच्या पंधरा दिवसात ह्यावर नियंत्रण आणू शकू आणि पुढची सभा संपल्यानंतर त्याच्या पुढच्या सभेमध्ये

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपण मच्छर मारण्याचे औषध आणले आहे की, फक्त मच्छर पळवण्यासाठी औषध आणले आहे.

**डॉ. बावस्कर :-**

त्यावर मी स्पष्टीकरण सभेमध्ये केलेले आहे.

**हॅरल बोर्जीस :-**

डॉक्टर बावस्कर सांगतात त्याप्रमाणे आपण त्यांना पंधरा दिवस देउ. पंधरा दिवसात काय फरक पडतो ते आपण बघू या.

**शरद पाटील :-**

पंधरा दिवस काय आम्ही त्यांना महिनाभर वेळ द्यायला तयार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

आपल्याकडे जे प्लास्टिकचे पंप आणले आहेत ते पंप बरोबर चालत नाही. जुने जेवढे पंप आहेत त्या एकाही पंपामध्ये व्हायसर नाही. त्या पंपाची नोझल सर्व लिकेज आहेत. अनेक वेळा तक्रारी करून ते बनवून झाले नाही. शहरामध्ये जिथे जिथे रोड वायडिंग झाले आणि जिथे खड्डे आहेत तिथे डबकी आहेत. त्या डबक्यांमध्ये तुम्ही अजूनपर्यंत औषध फवारणी केलेली नाही. सभापती महोदय, ह्या गोष्टीचा विचार करा आणि ते सर्व फुलफिल होण्याकरिता विचार करा आणि पुढचे पंधरा दिवस तुम्ही त्यांना द्या.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्या सफाई कामगारांना साहित्य कोण पुरवतो?

**डॉ. बावस्कर :-**

ठेकेदारांच्या सफाई कामगारांना साहित्य ठेकेदार पुरवितात आणि सफाई कामगार महापालिकेचे असतील तर आपण पुरवतो.

**जोजफ घोन्सालवीस :-**

त्याच्यावर देखरेख कोण ठेवतो?

**डॉ. बावस्कर :-**

स्वच्छता निरीक्षक देखरेख ठेवतो.

**मिलन म्हात्रे :-**

डॉक्टर साहेब, आरोग्य विभागाचे जेवढी वाहने आहेत, हत्यारे आहेत ती सर्व बाद आहेत.

**हॅरल बोर्जीस :-**

बावस्कर साहेब, सगळया सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. आपण त्वरीत स्वच्छता निरिक्षकांची सभा घ्या आणि ह्या सूचना आहेत त्याच्यावर विचारविनिमय करा.

**आसिफ शेख :-**

जबाबदारी निश्चित करा. स्थायी समितीच्या सदस्यांची तक्रार येता कामा नये. आता आम्ही आणि सन्मा. सदस्यांनी सूचना केली. ती आपण गांभिर्याने घ्या आणि सर्व एस.आय. यांना तसे इन्स्ट्रक्शन द्या.

**डॉ. बावस्कर :-**

ठिक आहे.

**शरद पाटील :-**

आपण येथे ए.सी.मध्ये बसतो. खाली आमचे जे ऑफीस आहे तिथे बसा आणि जाउन बघा मच्छर आहे किंवा नाही.

**मिलन म्हात्रे :-**

आपण तिथे येउन बघा, मच्छरांचा सडा पडलेला आहे.  आता ही येउन बघा आतापण अजून साफ केले नाही.  आपल्याकडे ए.सी. लागली आहे आणि सगळे बंद आहे म्हणून दोन-तीन दिवस आपण येथे खुले ठेवा आणि मग बघा.

**चंद्रकांत वैती :-**

डॉ. बावस्कर साहेब, याबाबतीत नगरसेवकांच्या नाही तर नागरिकांच्या देखील भावना तीव्र आहेत.  म्हणजे हा रोष कोणापर्यंत असावा. अगदी म्हणजे आमच्या घरातुन सांगितले गेले, काय उपयोग आहे तुमचा नगरसेवक असून.  केवढे मच्छर चावते.  इतकी बिकट परिस्थिती सांगतो. शहराच्या काही भागात संपूर्ण शहरामध्ये आपण आज किती ही सांगितले की, या शहराला आरोग्य अधिकाऱ्याचे फार मोठे स्वप्न दाखवले की, या शहरात अशा प्रकारची फवारणी करू आणि सर्व शहरात एकावेळेला फवारणी केल्यानंतर मच्छरांचा नायनाट केला जाईल वगैरे वगैरे सगळया गोष्टी, विविध प्रकारची नविन औषधे तुम्ही रेफर केली.  हायब्रिट टाईम कुठला आहे, कुठे कुठे पाणी स्टॅगनंट होते. कुठे आपल्याला कशा प्रकारे फवारणी करता येईल.  धुरांडी कशी आणता येतील. या सगळ्या गोष्टी मंजूर करुन घेतल्या.  परंतु मच्छरांच्या बाबतीत आजपर्यंत कुठल्याही बाबतीत विशेष असा प्रभाव आपल्याला दाखवता आला नाही की, आपण मच्छरांच्या बाबतीतमध्ये जी एखादी योजना आपण हाती घेतली आणि तातडीने त्याच्यावर अंमलबजावणी झाली आणि नीट आपल्याला त्याच्यावर काहीतरी निर्णय मिळाला.  याच्या आधी कल्पतरू पेस्ट कंट्रोल यांच्या माध्यमातून ह्यांना आपण कॉन्ट्रक्ट दिला होता.  मिरा रोडवर प्रायोगिक तत्वावर मॉस्कीटो एलिमेशन ड्राइव्ह राबविण्यात आला होता आणि त्यावेळेला मिरा रोडमध्ये अतिशय चांगला असा परिणाम दिसला होता.  या शहराची भौगोलिक स्थिती आपण पाहिली तर शहराच्या एका बाजूला पूर्णपणे खाडी, मारशी लॅन्ड आणि एका बाजूला जंगल आणि या शहराची भौगोलिक रचना अशी आहे की जिथे खोदू तिथे आपल्याला पाणी मिळेल आणि पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नाही.  याठिकाणी डेव्हलपमेंट झाले आणि ज्याठिकाणी डेव्हलपमेंट झाले नाही त्याठिकाणी त्या पाण्यावर ते मच्छर ताबडतोब वाढते आणि मच्छरांचा प्रार्दुभाव ताबडतोब दिवसेंदिवस एवढा म्हणजे या शहराची लोकसंख्या वाढली त्याच्याने मच्छर देखील शेअर व्हायला पाहिजे.  सात लाख लोकांना मच्छर चावल्यानंतर, मच्छर शेअर झाल्यानंतर कमी वाटायला पाहिजेत.  परंतु दिवसागणिक ते वाढत आहे आणि आज आपण सांगत आहात की, पंधरा दिवस करू व आपण ह्याच्यात काहीतरी ठोस निर्णय घेउ, मला वाटत नाही ते शक्य आहे. जर ते आपल्याला शक्य होत नसेल तर तशाप्रकारे आपण सरेंडर व्हावे आजच्या सभेपुढे की, माझ्याने ते होणार नाही.  ह्याच्यावर आपण पेस्ट कंट्रोल यांची ह्याच्यावर नेमणूक करू.  कारण एकतर असाच लोकांमध्ये भयंकर रोष आणि आपण काही देउ शकलो नाही, या थंडीच्या दिवसात टिक टाईम आहे.  पण थंडी कमी झाल्यानंतर थोडेसे मच्छर पुन्हा कमी होईल आणि आपण सांगणार की, हे आमच्या औषधामुळे कमी झाले तर हे असे काही सांगण्यासाठी तुम्ही अवधी घेउ नका.  ह्याच्या आधी आपण नेमके काय केले पाहिजे. आपण ती फवारणी करणार होतो, ती कधी करणार आहोत. ते निश्चित करा.  झोन फिक्स करा की, ह्या झोनमध्ये आपण ही कामगिरी करतोय आणि ह्याच्यासाठी आपल्याला नविन काय योजना राबविता येईल.  याबाबत योग्य ते असे उत्तर द्या.  खरंतर आजच्या विषयामध्ये आपण हा विषय घेतला नाही पाहिजे.  आपल्याला मिरा भाईंदर निरोगी बनवायचे आहे ते आपण निरोगी कधी बनवणार कारण उद्या साथीचे रोग सगळयात जास्त पसरण्याची संधी जास्त कुठे असेल तर ती मिरा भाईंदरमध्ये निर्माण होईल मच्छरांमुळे म्हणून आपण निरोगी भाईंदर बनविण्यासाठी औषधे मागवणार आहोत. पण त्याच्या आधी मच्छरांवर काय करणार आहोत याबाबत आपण वक्तव्य करावे.

**शरद पाटील :-**

आता वैती साहेबांनी आपल्याला जे बोलले ते फॅक्ट आहे.  परवाच्या दिवशी सर्व नागरिक धुर मारा म्हणून मागणी करत होते पण परवाच्या दिवशी तर धुरवाल्याला येथून पळवा, धुर मारू नका. येथून त्याला हाकला.  अशी परिस्थिती आलेली आहे.  त्या फ्रॉगींग मशीनवाल्याला येथून हाकलण्याची परिस्थिती नागरिकांनी आणली आहे आणि एक बोलतो धुर मारल्यामुळे आमच्या हॉटेलमध्ये चोरी होते आणि मच्छर तर मरतच नाही ही सत्यस्थिती आहे.

**याकुब कुरेशी :-**

पुर्वी बरोबर औषध मारले असते तर मच्छर वाढले नसते आणि एवढे औषध मागवावे लागले नसते.

**आसिफ शेख :-**

सर्वांनी या ठिकाणी ज्या भावना व्यक्त केले आहेत त्याचा आपण गांभीर्याने विचार करा.

**मा. सभापती :-**

गांभीर्याने विचार करतो. एवढे मला चांगले वाटत आहे की, येथे एकही मच्छर मला दिसत नाही. येथे फवारणी केल्यामुळे बाकीचे मच्छर दुसऱ्या ठिकाणी गेलेले आहेत असे मला दिसत आहे. म्हणून आपल्या सर्व नगरसवेकांना विश्वासात घेउन डॉक्टर साहेबांना चांगले औषध आणण्यासाठी आणि पंधरा दिवसाच्या आत सर्व मच्छर नाहीसे होउ शकत नाही म्हणून मच्छर मारण्याचे चांगले औषध आणण्यासाठी सांगत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

चांगले औषध आणण्यासाठी आपण मंजूर केलेले आहे आणि ते पास ही झाले आहे. जे औषध आणले आहे ते औषध कदाचित खराब असेल.

**आसिफ शेख :-**

आम्हाला तेच म्हणायचे आहे जे रेकॉर्डवर औषध आहे तर औषध आणण्यात यावे.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, आलेल्या सर्व किटकनाशके, अळीनाशकाची अनलिटीकल लॅबोरेटी मधून तपासणी करून घेण्यात आलेली आहे. मला ह्याचा संशय सुरूवातीला यायला लागला होता की, हे खरंच इफेक्टीव्ह आहे की नाही. म्हणून मी ह्याचे सगळे सॅम्पल घेउन वेगवेगळया विभागातील सॅम्पल घेउन लॅबोरेटीमध्ये तपासणी करून घेतलेले आहे आणि ह्याचे रिपोर्ट आपल्याकडे उपलब्ध झालेले आहेत. हे रिपोर्ट मी मा. सभापती साहेब यांना सादर करीन.

**आसिफ शेख :-**

औषधांचा प्रभाव मच्छरांवर का नाही? मच्छरांचा प्रभाव औषधांवर झालेला आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आज मी जास्त बोलणार नाही. सर्व सदस्यांच्या भावना तीव्र आहेत. या सगळया भावना लक्षात घेउन उद्यापासूनच मी प्रोग्राम सुरू करतो आणि काय कार्यक्रम करतो हे लेखी मा. सभापती साहेब यांना कळवितो पाहिजे असेल तर मी आपल्याला प्रत्येकाला त्याची प्रत देण्याची माझी तयारी आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जी औषधे मागिवली त्याच्यामध्ये काळया टाईपचे कलचर विकत घेतले त्याची अमाउंट जवळ जवळ साडेतीन लाख रूपये आहे. तर ते कलचर जर आपण त्याचे ब्राउचरमध्ये जर बघितले तर ते कलचर अठ्ठावीस डिग्री सेल्सिअस तापमान झाले तर त्याने तयार होणार बॅकटेरिया आपोआप मरायला लागते आणि आपण आपल्या येथले जर वेदर बघितले तर ते बत्तीस सेल्सिअसच्या खाली कधीच जात नाही. त्यामुळे ते जे आपण कलचर आणलेले आहे ते त्या डिलरला परत करून बत्तीसच्या वर टिकेल त्या टाईपचे कलचर पाहिजे. आपल्या साडेतीन लाखाचे आपण जे बॅकटेरिया बनविण्याचे काळया रंगाचे जे कलचर मागितले त्याच्यामध्ये हा फॉल्ट आहे.

**याकुब कुरेशी :-**

माझ्यामते आता थंडी चाललेली आहे. त्यामुळे अठ्ठावीस डिग्रीच्यावर टेम्परेचर नाही आहे.

**मिलन म्हात्रे :-**

आपण हे साडेतीन लाखाचे आणले आहे. आता जरी सकाळी थंडी असली तरी एक वाजता टेम्परेचरने माणसांना घाम यायला लागतो आणि त्यावेळेला बत्तीस डिग्री सेल्सिअसच्या वर आपले तापमान जाते. ते तापमान वर गेले की, झालेले बॅकटेरिया मरायला सुरूवात होते.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, म्हात्रे साहेबांनी ज्या कलचर बद्दल सांगितले आहे ते कलचर डासांसाठी नाही आणि हे जे कलचर आहे ते आपण कचऱ्यावर ट्रिटमेंट करण्यासाठी मागवलेले आहे. ज्यावेळेला हे मागवले त्यावेळेला रोम टेम्परेचर हे स्टेबल आहे असे सांगण्यात आलेले आहे. त्याची मी तपासणी करून घेतो आणि तसे असेल तर आपण परत करू.

**मिलन म्हात्रे :-**

आमचे म्हणणे असे की, आपल्याकडे टेमपररी जो बारा तास टेम्परेचर आहे त्याला टिकणारे तुम्ही मागवा. साडे तीन लाख रूपये आपण ह्याला खर्च करतोय.

**डॉ. बावस्कर :-**

रोम टेम्परेचरला स्टेबल असणारे औषध आवश्यक आहे आणि रोम टेम्परेचर म्हणजे जे नेहमीचे आपले वातावरण असते त्याला स्टेबल असते तशाच प्रकारे ते मागवलेले आहेत आणि त्याला परत बोलावून मी त्याची खात्री करून घेतो.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, हा जो १९७ चा विषय आहे. भाईंदर पुर्वेला दोन आरोग्य केंद्राची संख्या दाखवलेली आहे. ती आरोग्य केंद्र त्या ठिकाणी बनविली आहेत ती कुठे आहेत? माझ्या माहितीप्रमाणे बंदरवाडी शाळेच्या येथे आरोग्य केंद्राची निर्मिती चालू आहे. पण त्याचा उल्लेख अजून येथे काही दिलेला नाही. नेमकी कुठल्या ठिकाणी दोन आरोग्य केंद्र आहेत.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती महोदय, सन्मा. सदस्य नलावडे साहेबांनी जो प्रश्न केला. त्यामध्ये आपण नवघरच्या शाळेत आणि बंदरवाडीच्या शाळेत अशा दोन ठिकाणी आरोग्य केंद्राची आपण व्यवस्था करणार आहोत आणि एक केबिनचे तिथे आहे. जे नवघर आणि बंदरवाडीचे आरोग्य केंद्र आहे ते आरोग्य केंद्र एकच आहे. पण दोन ठिकाणी आपण ओ.पी.डी. चालवणार आहोत. बंदरवाडीच्या शाळेमध्ये आपण आपली तयारी सुरू केलेली आहे. त्यामुळे त्याचा उल्लेख कदाचित आला नसेल. परंतु बंदरवाडीच्या शाळेत आपण आपले आरोग्य केंद्र सुरू करणार आहोत. त्या ठिकाणची व्यवस्था आपली जवळ जवळ पुर्ण करण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, १९७ मध्ये ही जी परिशिष्ट (अ) दिले आहे त्याच्यात १४७ आणि १४८ मध्ये रिपीट झालेले आहे. एकच औषध दोनवेळा मोजण्यात आलेले आहे.

**डॉ. बावस्कर :-**

होय, हे रिपीट झाले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ठिक आहे, आपण ते डिलीट करून घ्या.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय हे जे औषध आपण आणणार आहोत ते कुठल्या रोगावर मेन मेन औषध आणणार आहोत.

**डॉ. बावस्कर :-**

ही जी औषध आहेत ती जनरल प्रॅक्टीसनर आपले जे दवाखाने आहेत त्याच्यात आपण एम.बी.बी.एस डॉक्टरांची नेमणूक करणार आहोत आणि जनरल प्रॅक्टीसनर एम.बी.बी.एस. डॉक्टर ज्या आजारावर उपचार करू शकेल त्यासर्व आजारावर ह्याच्यावर सर्दी, खोकला म्हणजे रिसपायररेटीव्ह डिसीसेस आले त्याच्यानंतर इंटरेस्ट स्टायनल डिसीसेस आले त्याच्यामध्ये लुज मोशन आले. त्याच्याबरोबर ब्लडप्रेशर जे अनकॉम्पलीकेटेड हायपरटेन्शन असेल अशावर सुद्धा उपाययोजना आहेत. स्कीन डिसीसेस आहे जवळ जवळ सगळया आजारांवर गायनॉलोजीस काही औषध ह्याच्यामध्ये आहेत. सगळया आजारांवर जे कॉमन औषध आहे, पेनकिलर आहे, तापावर आहे. या सगळया गोष्टी ज्या एम.बी.बी.एस लेव्हलवर ज्या दवाखान्याच्या पातळीवर आपल्याला औषध उपचार करता येतील अशी सगळी ऑयलमेंट त्याच्यावर आहे. आय, ईअर ड्रॉप आहे. त्या सगळया गोष्टी आपण ह्याच्यामध्ये कन्सीडर केलेल्या आहेत आणि वेळेवर जी इंजेक्शन द्यायची आहेत. त्या ठिकाणी आपण जी इंजेक्शन देउ शकतो तशा इंजेक्शनचा समावेश आहे आणि हे सगळे औषध आपण ह्याच्यामध्ये कव्हर केलेले आहे.

**मिलन म्हात्रे :-**

ह्याच्यामध्ये आम्ही एक ही एम.बी.बी.एस. नाही आहे. ह्याच्यामध्ये आम्ही आमच्या तऱ्हेने स्टडी केली आहे आणि त्याच्यात जे डबल जे काही झाले आहे ते आपण डिडक्ट करण्यात यावीत.

**धनराज अग्रवाल :-**

आपण ह्याच्यात जे घोषदायंता पास केले तर त्यांच्या गुणवत्तेचा विचार केला काय?

**डॉ. बावस्कर :-**

होय. यामध्ये निविदा मागविताना एक महत्त्वाची अट होती की, ह्या कंपनीची कुठलीही औषधे ह्यापुर्वी त्यांना कन्व्हेक्शन व्हायला नका, नो कन्व्हेक्शन सर्टीफिकेट प्रत्येकाचे घेतलेले आहे. त्यांच्यावर

कुठलाही गुन्हा औषधाच्या भेसळीबाबत किंवा सबस्टँडर्ड ह्याच्यामध्ये तो नोंदणी केलेला नसावा. त्याच्यानंतर एफ.डी. कडून त्याचे परफॉमन्स सर्टीफिकेट त्यांच्याकडून घेतले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण जी माहिती देता पण आपण डिस्ट्रीब्यूटरकडून औषध घेतलेले आहे, कंपनीकडून घेतलेले नाही. आपण माहिती देता की आपण हे सर्व कंपनी कडून सर्टीफिकेट घेतलेले आहे. पण कंपनीकडून आपण औषधच घेतलेले नाही आहे.

**डॉ. बावस्कर :-**

जरी डिस्ट्रीब्यूटर असला तरी त्या डिस्ट्रीब्यूटरकडे ज्यावेळेला तो औषध कोट करतो किंवा एखाद्या डिस्ट्रीब्यूटर असला तर तो कंपनीचा अधिकृत विक्रेता असतो आणि बऱ्याच कंपन्या डायरेक्ट टेंडर भरत नाही. ते त्या डिस्ट्रीब्यूटर थ्रूच टेंडर भरतात आणि अशावेळेला तो डिस्ट्रीब्यूटर त्या कंपनीकडून असे पेपर त्यांच्याकडून मागवून घेतात आणि ती गोळा करतात आणि आपण प्रत्येक वेळेला आल्यानंतर आपण आपले स्वतःचे सॅम्पल घेउन आपण लॅबोरेट्रीला तपासणीसाठी पाठवणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

त्याने तुमच्याकडे गोळा केले आहे का, ते मला सांगा. त्याने तुमच्याकडे गोळा केले नसेल हे मी तुम्हाला सांगतो.

**डॉ. बावस्कर :-**

टेंडर घेताना ते पाहूनच सगळे केलेले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही सांगितले सर्टीफिकेट गोळा केलेले आहे. पण सर्टीफिकेट डिस्ट्रीब्यूटरकडे नसते कारण मी सुद्धा डिस्ट्रीब्यूटर आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आपण जे बोलता ते आपले म्हणणे बरोबर आहे. डिस्ट्रीब्यूटरकडे सर्टीफिकेट हे नसते परंतु असे टेंडर कोट करताना डिस्ट्रीब्यूटर कंपनीकडून हे सर्टीफिकेट घेतात. मी मागच्या जवळ जवळ पंधरा ते वीस वर्ष हे टेंडर फायनल केलेले आहे आणि त्याची प्रॅक्टीस केलेली आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण हे सर्टीफिकेट घेतलेले आहे का, ते मी विचारतो.

**डॉ. बावस्कर :-**

पेपर बघूनच आपण घेतले आहे आणि एक टेंडर आपण रिजेक्ट ही केले आहे.

**धनराज अग्रवाल :-**

ते रिजेक्ट तुम्ही कसे केले ते बरोबर भरलेले नव्हते का?

**डॉ. बावस्कर :-**

ते बरोबर भरलेले नव्हते आणि पेपरही त्याच्याकडे नव्हते.

**धनराज अग्रवाल :-**

त्याच्याकडे सर्टीफिकेट नाही म्हणून रिजेक्ट कसे केले?

**डॉ. बावस्कर :-**

सर्टीफिकेट त्याच्याकडे नव्हते त्याने सर्टीफिकेट लावले नव्हते. ह्या सर्वांची खात्री करूनच आपण ते रिजेक्ट केले.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती साहेब, भिंवडी नगरपालिकेचे असे एक केस झालेले आहे. आरोग्य अधिकारी गर्व्हरमेंटने नेमलेला आहे. तिथे औषधाची सर्व तपासणी केली. तपासणी करताना लाखो रूपयाचे औषध बिन जरूरीचे आणलेले होते. ती खराब क्वॉलिटीचे आणलेले होते.

**डॉ. बावस्कर :-**

ती बिन जरूरीचे औषध घेण्याची गोष्ट वेगळी. आपण जवळ जवळ साडे तीनशे, तीनशे पंच्यान्नव अशी त्यांची एकूण यादी होती. त्यापैकी आपण फक्त १८६, १८५ जी आपल्याला आवश्यक आहे तेवढीच आपण ठेवलेली आहे. आपण विनाकारण कोणतेही औषध जास्त प्रमाणात मागवणार नाहीत किंवा जास्त प्रमाणात औषध घेणार नाहीत.

**धनराज अग्रवाल :-**

आपण हे जे दवाखाने चालू केलेली नाही आहेत आणि डॉक्टर ही अजून आलेले नाही आहेत.

**डॉ. बावस्कर :-**

ते प्रकरण आज आपल्याकडे मंजूरीसाठी आहे.

**धनराज अग्रवाल :-**

कोणत्याही डॉक्टरला न विचारता आपण हे औषध मागवत आहोत.

**डॉ. बावस्कर :-**

मी स्वतः डॉक्टरच आहे. मी प्रॅक्टीस करतो. मी टेंडर बनवलेले आहेत. साहेब, हे जनरिक नावे आणि हे टेंडर तयार करणे फार मोठे जिकरीचे काम असते. हे फॉरमोकोलेजीकल नेम आणि हे टेकनिकल नावानेच सगळया गोष्टी मागवाव्या लागतात. जे औषध बाजारात उपलब्ध असतात त्याचे ट्रेड नेम, बॅड नेमचे असतात तशी आपल्याला मागवता येत नाहीत. आज जे साहेब बोलले, त्याचे एक उदाहरण घेतले तर डायक्लोक्लेनिक सोडीयम त्याच नावाने हे औषध मागवावे लागते. त्याला डायक्लोरीया किंवा बाकीच्या कुठल्याही ट्रेड नेमने हे मागवलेले नाही आणि आपण प्रत्येक सप्लायच्या वेळेला त्याचे टेस्टरिपोर्ट आपण घेणार आहोत. आपण प्रत्येक सप्लायच्या वेळेला आपले सॅम्पल काढणार आहोत. पाहिजे तर आपण कुणाच्या एकाचे नाव सांगा त्यांना आपण सॅम्पल काढायला लावू. परस्पर तिसऱ्या व्यक्तीला सॅम्पल काढायला लावू. क्लॉलिटीमध्ये कुठेही आपल्याला कॉम्परोमाईज करायचे नाही. आपण सांगाल त्या व्यक्तीला मी सॅम्पल घ्यायला लावतो.

**धनराज अग्रवाल :-**

सॅम्पल कोणीही काढत नाही. आपण मला येथे सभागृहात किती ही सांगितले की औषधाचे सॅम्पल देणार आहोत आणि त्याची रिपोर्ट घेणार आहोत पण तसे कोणीही करत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

मी यापुर्वी जेवढे ही टेंडर ठाणे महानगरपालिकेमध्ये काढले तेव्हा प्रत्येक वेळेला मी टेस्ट रिपोर्ट घेतलेले आहे आणि प्रत्येक वेळेला ॲनालेसेस करून घेतलेले आहे. माझ्या सुरक्षिततेसाठी ह्या सगळया गोष्टी करणे मला गरजेचे आहे.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही औषध जे आणले त्याचे टेस्ट रिपोर्ट घेतले त्याचा उपयोग काय झाला? तर काहीच नाही.

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, आपण पाठवून द्या.

**धनराज अग्रवाल :-**

हे आपण चुकीचे बोलता. असे नाही की, मी पाठवले ते बरोबर आहे आणि तुम्ही घेतले ते खराब आहे.

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, माझ्या विश्वास नसेल तर आपण तिसऱ्याकडे देउ.

**धनराज अग्रवाल :-**

विश्वास नसेल तर मी प्रश्न विचारत नाही. मी खाली बसतो. तुम्हाला सांगायचे नसेल विचारू नका तर विचारत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

आपण प्रश्न विचारा. प्रश्न विचारल्याबद्दल मी म्हणत नाही. परंतु ह्या सगळया गोष्टी आपण करणार आहोत. तर आपल्या काही सुचना असतील तर त्या सुचना आम्ही मान्य करू.

**धनराज अग्रवाल :-**

तुम्ही जे सांगता की, आम्ही हे लॅबोरेट्रीमध्ये देउ ते मला मान्य नाही आणि तुम्ही ते देणार ही नाही हे मला माहित आहे. कोण औषधाचे सॅम्पल लॅबोरेट्रीमध्ये देतो?

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, त्याची खात्री आपल्याला करून घेता येईल.

**धनराज अग्रवाल :-**

ह्याच्यामध्ये डायरेक्ट कंपनीकडून कुठलेही औषध घेण्यात आलेले नाही.

**डॉ. बावस्कर :-**

डायरेक्ट कंपनीकडून औषध घ्यायचे असेल तर आपण डायरेक्ट कंपनीकडून देखील औषध घेउ. माझा कुठलाही असा आग्रह नाही. नियमानुसार निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. निविदा मागवून त्याची स्क्रुटनी सगळया गोर्ष्टीची करून आपण निविदा मंजुरीसाठी ठेवलेले आहे. जर आपल्याला डायरेक्ट कंपनीकडून घ्यायचे असेल तर माझा त्याला ही हरकत नाही.

**धनराज अग्रवाल :-**

आपण एकतर डायरेक्ट कंपनीकडे देत नाही आणि सांगता की त्याला माझी हरकत नाही.

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, माझ्या बोलण्याचा अर्थ त्या अनुषंगाने निविदा भरताना ब-याचसा कंपन्या डायरेक्ट निविदा भरत नाही. यामध्ये एका कंपनीने डायरेक्ट निविदा भरलेली आहे. बरेचसे कंपनी ज्यांचे डिस्ट्रीब्यूटर असेल तर ज्या डायरेक्ट निविदा भरत नाही त्यांचे डिस्ट्रीब्यूटर मार्फत निविदा भरले जाते.

**धनराज अग्रवाल :-**

ज्यांनी निविदा भरलेली आहे त्यांना आपण ऑर्डरच दिलेली नाही.

**डॉ. बावस्कर :-**

आहे ना गल्फ लॅबरोट आणि येथे पुन्हा आपल्याला किमतीचे ही बंधन आहे. आपल्याला किंमतीसुद्धा बघाव्या लागतात.

**धनराज अग्रवाल :-**

आपण येथे माणसांना औषधे देणार आहोत.

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, आज स्थायी समितीने जर ठराव केला की, डायरेक्ट कंपनीकडून औषध घ्यायचे तर माझी त्याला हरकत नाही. डायरेक्ट कंपनीकडून घ्यायला माझी त्याला तयारी आहे.

**धनराज अग्रवाल :-**

आपण हे माणसांना औषधे देणार आहोत तर ते चांगल्या कंपनीचे औषध असली पाहिजे असा मी येथे प्रस्ताव मांडत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

गर्व्हरमेंटचे नगरपालिकेतर्फे आपण जे ओ.पी.डी. सेन्टर चालू करणार आहोत. जे जिल्हा परिषदकडून राष्ट्रीय स्तरावर जे आरोग्याचे कार्यक्रम राबविले जातात, जसे फॅमिली प्लानिंग आहे, एच.आय.व्ही. चे आहे त्याबद्दल सुद्धा आपल्या केंद्रावरून गर्व्हरमेंटचे जे कार्यक्रम आहेत आरोग्य विषयाचे ते आपल्याला चालू करावे लागतील. त्याची तुमच्याकडे काही तरतुद नाही आहे, ती करून घ्यावी.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सो.) :-**

सन्मा. सदस्य मिलनजी म्हात्रे आपण जी भावना व्यक्त केली. सर्व जनतेला चांगले आरोग्य लाभावे आणि त्यादृष्टीने आपण प्राथमिक आरोग्य केंद्र सर्व प्रभागामध्ये आपण राबविण्याचा प्रयत्न करत आहोत आणि प्रामुख्याने आपण जे सांगितले की, एच.आय.व्ही. बाधित लोकांना सुद्धा औषधोपचार आपल्या मार्फत देण्यात यावे. कॉपर टी बसविण्यात यावे. या सर्व गोष्टी देण्याकरिता आपल्याला बराच कालावधी लागणार आहे आणि आपल्याला स्टेप बाय स्टेप जायचे आहे. आता आपण जे प्राथमिक आरोग्य केंद्र सुरू करत आहोत त्या प्राथमिक केंद्रामध्ये प्राथमिक स्वरूपाचे जे आजार आहेत, जसे खोकला आहे, सर्दी आहे, ताप आहे, हगवणची लागण आहे. अशा त-हेचे जे पेन्शटचे आहेत अशा लोकांना प्राथमिक स्वरूपाची सुविधा देण्यात येणार आहे. माझ्याकडे आजच पत्र आले मा. मंत्री यांच्याकडून मंत्रालयामधून की, जे नगरपालिकेचे टेम्बा हॉस्पीटल आहे ह्याचा कर्मचारी घेण्यास तुम्ही तयार आहात का? त्याबाबतचा ताबडतोब अहवाल मी संबंधित हॉस्पीटलकडून मागून घेतला आहे आणि अशात-हेचे आपल्याकडे जेव्हा मोठे हॉस्पीटल उभारण्यात येईल त्यावेळी आपण तिथे मोठे ऑपरेशन, छोटी-मोठी ऑपरेशन, प्रसृतीगृह या त-हेच्या कल्पना या भावी कल्पना आहेत. आता आपल्या समोर जे आहे ते प्राथमिक आरोग्य केंद्र प्रत्येक भागातील आपल्या नागरिकाना आरोग्यासाठी प्राथमिक स्वरूपाच्या सुविधा देण्यात येत आहे.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब, आज हे मंजुरीला आलेले आहे तर माझे म्हणणे असे आहे की, आपण हे जे काय ठराव करतोय त्याच्यामध्ये एक ओळ ती टाकावी. जेणेकरून शासनाचे जे काही आरोग्य विषयाचे

कार्यक्रम आहेत त्याच्यात आपल्याला करायला ती तरतुद नसणार आहे. म्हणून शासनाचे जे आपल्याला कार्यक्रम राबवायचे आहे त्यासाठीचा खर्च ह्याला सुद्धा येथे मंजुरी देण्यात यावी. असे मी सांगतोय. आता आपल्याकडे ओ.पी.डी. सुरू होउन तीन महिने झाले. डॉक्टरांकडे काही महिला जाउन बोलायला लागले की, आम्हाला हा आजार आहे. तर तुमच्याकडे ती तरतुदच नसणार आहे. हा ठराव पास करताना ह्याची एक लाईनमध्ये तुम्ही तरतुद करून घ्या. कागदामध्ये तरतुद केल्याने तुम्ही लगेच चालू केले असे होत नाही. फक्त एक प्रोव्हीजन करून घ्या आणि त्याला मंजुरी घ्या, एवढेच मी बोलतोय आणि हे जे आपण ज्या परपजकरिता ओ.पी.डी चालू करत आहोत तोच त्याचा परपज आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

उत्तन विभागासाठी अद्याप जागा नाही आहे तर उत्तन विभागासाठी जे प्रायमरी सेंटर आहे ते आपल्याला ट्रान्सफर करता येत नाही का?

**डॉ. बावस्कर :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. शासनाकडे दोन्हीही आरोग्य केंद्र आपल्याकडे ट्रान्सफर करण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे.

**मिलन म्हात्रे :-**

केळकर साहेब आपण आयुक्त साहेबांना आणि मा. महापौर साहेबा यांना घेउन उत्तन येथे गेलो होतो पाली येथे समाजमंदिर बघितले आणि उत्तन येथे एक समाजमंदिर बघितले त्याच्यामध्ये पालिका दोन बघितले एक लाकडी पुलाच्या येथे आणि एक बालवाडी. त्या दोन जागेसाठी चर्चा झाली त्यावेळी डॉक्टर साहेब नव्हते. तेव्हा अगदी आयुक्त साहेबांनी आपल्याला आदेश दिले तिथे वर माळा आहे तिथे आपल्याला सुरू करायचे आहे. ते जर तुम्ही क्लिअर केले तर बरे होईल. उत्तनच्या संदर्भात सन्मा. सदस्यानी प्रश्न विचारला आहे.

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

पाली येथे ते समाजमंदिर आहे आणि तिथे आम्ही आयुक्त साहेबांसोबत पाहणी करत आहोत.

**जोजफ घोन्सालवीस :-**

आपल्याकडे प्रायमरी सेंटर आहे ते आपण ट्रान्सफर करत नाही का?

**कल्याण केळकर (मा. उपआयुक्त सा़ो.) :-**

शासनाकडे त्याचा पाठपुरावा करत आहोत

**डॉ. बावस्कर :-**

आरोग्य विभागाकडून विचारणा झालेली आहे की, हा सध्याचा कर्मचारी वर्ग प्रतिनियुक्तीवर घेण्यासाठी तयार आहात का? याबद्दलचा आपला निर्णय झाल्यानंतर ट्रान्सफरच्या फेजमध्ये ते आहे त्यातले काही कर्मचारी जर आपण घेउ शकत असू तर बाकीचे कर्मचारी ते इतर ठिकाणी ट्रान्सफर करतील आणि दोन्ही प्राथमिक आरोग्याचे आपल्याकडे हस्तांतरण होउ शकेल. उत्तनच्या बाबतीमध्ये सध्या आपल्याकडे आरोग्यकेंद्र चालू आहे ते बंद झालेले नाही. शासनाचे अजून चालू आहे. जागेबाबत माझा थोडासा आग्रह होता की मध्यवर्ती ठिकाणी जागा जर उत्तन सारख्या गावाच्या ठिकाणी किंवा दोन्ही रस्त्याच्या जंक्शनवर अशा ठिकाणी पोलीस चौकी वगैरे आहे. अशा ठिकाणी जर जागा मिळाली तर सगळया नागरिकांना त्याचा चांगला फायदा होणार आहे. आता जे आरोग्य केंद्र आहे ते एका कोप-यावर आहे. बरेचसे नागरिक त्या ठिकाणी जाउ शकत नाही. फार कोप-यामध्ये जावे लागते. त्यामुळे इतर विभागातील नागरिकांना पाहिजे तसा त्याचा फायदा होत नाही. जर मध्यवर्ती ठिकाणी एखादी जागा आपल्याला उपलब्ध झाली तर अतिशय सोयीचे होईल आणि त्यासाठीच आपल्याला प्रयत्न करायचे आहे.

**जोजफ घोन्सालवीस :-**

शासनाने निर्णय दिल्यावर काय करणार आहात.

**डॉ. बावस्कर :-**

सध्या तर ते चालूच राहणार आहे. परंतु जर मध्यवर्ती जागा झाली तर ही जागा आपल्याला महानगरपालिकेच्या इतर कामासाठी वापरता येईल.

**चंद्रकांत वैती :-**

मा. सभापती साहेब, आपण प्रथम या मिरा भाईंदरमध्ये जो मागासवर्गीय समाज आहे. झोपडपट्टया आहेत, त्या ठिकाणी आपण हे दवाखाने उघडण्याचा प्राथमिक स्वरूपात ठरवले आणि आज त्याला अंतिम स्वरूप आपण देत आहोत. जर हा आपला दवाखाना उघडण्याचा कार्यक्रम जर यशस्वी झाला तर इतर भागात देखील त्याचा विचार करावा आणि ह्याबरोबर आपण फिरत्या दवाखान्याची

देखील संकल्पना आपल्या मनामध्ये आहे ती आपण राबवितोय. त्याच्यामध्ये विशेष करून जे मागासवर्गीय आहेत, जे दलित आहेत व जिथे झोपडपट्टया आहेत आणि तिथे सगळया गोष्टीचे इलाज या दवाखान्याच्या माध्यमातुन होणार नाही. परंतु प्राथमिक स्वरूपाचे आजार जे आहेत. त्याच्यापासून लोकांमध्ये चांगला मॅसेज जाईल. मिरा भाईंदर महानगरपालिका आपल्याला निरोगी ठेवता येईल आणि त्या अनुषंगाने आपण हे सुरूवातीला केले आहे आणि जर अशी मागणी केली तर आपण प्रत्येक गावात मागणी करु शकतो, असे करू शकतो. परंतु मला वाटत नाही त्याची आवश्यकता आहे. कारण आपल्या गावामध्ये, शहरी भागात जर असे दवाखाने ठेवले तर शहरी भागातील लोक त्याचा उपयोग करतीलच अशातला भाग नाही.

**अनंत पाटील :-**

उत्तन येथे जिल्हापरिषदेचे आरोग्य केंद्र आहे पण राई, मुर्धा, मोर्वा येथे आरोग्य केंद्र नाही. या सर्व लोकांना टेम्बा येथे यावे लागते. त्या सारख्या ठिकाणी जर आपण आरोग्य केंद्र उभारले तर चांगले होईल.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, प्रत्येक नगरसेवकांच्या ह्याच्यात काही सुचना आहेत. हा ठराव आपण काही ठराविक जागांकरिता आणला आहे. पण हा ठराव आपण मंजुर करताना आपण त्याच्यामध्ये सुधारित असे दोन लाईन टाकाव्यात की, आरोग्य विभागातर्फे यापुढे ज्या काही जागा आपल्या नगरपालिकेच्या ताब्यात आजच्या तारखेला आहे आणि त्याच्यामध्ये आपण हे लगेच सुरू करू शकतो अशा जागांचा समाविष्ट लवकर करण्यात यावा. जसे समाजमंदिर आहे, बालवाडया आहेत, हॉल आहेत हे जर आपल्याला आता कळले नाही पण आता जसे हे आपल्याला सांगत आहेत ते सुरू करा.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे आणि आज जो आपल्याकडे हा विषय आलेला आहे, त्याच्यामध्ये मी सभागृहाला विनंती करतो की, आपण ह्या सभागृहामध्ये मंजुरी देउन या विषयाला ठराव मंजुरी देतो असे मी मान्यता देत आहे.

**याकुब कुरेशी :-**

मला ह्यात असे सुचवायचे आहे, हे जे औषधाचे रेट आहे ते संपुर्ण चेक केले आहे का? मला असे वाटते की, कुठे कुठे जास्त लावले आहे. सन्मा. सदस्य धनराज अग्रवाल यांना ह्याच्याबद्दल जास्त माहिती असेल. आपण डिस्ट्रीब्युटर आहात असे आपण आताच म्हणालात.

**धनराज अग्रवाल :-**

मी औषधाचा डिस्ट्रीब्युटर नाही. मी कन्झ्युमअर प्रोडक्टचा डिस्ट्रीब्युटर आहे.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, असे आहे त्यांना आता आपल्या ज्या भावना येथे व्यक्त केल्या व त्यांनी पोटतिडकीने सांगितले आहे तर त्यांच्या शंकेचे निरसन होणे गरजेचे आहे. ते बोलले आणि तुम्ही पुन्हा वाद घातला आणि ते गप्प बसले. तुम्ही त्यांना तसे कन्व्हेन्स करा.

**मा. सभापती :-**

डॉक्टरांनी सांगितले तुम्हाला जे औषध घेउन यायचे आहे त्याला परवानगी देतो.

**डॉ. बावस्कर :-**

साहेब, यामध्ये वाद घालायचा नाही आहे. ते जेष्ठ सन्मा. सदस्य आहेत त्यांचा पुर्ण मान मी येथे राखतो. त्याच्याबद्दल मला आदर आहे. तसेच त्यांच्या ज्या सुचना आहेत त्याचे मी संपुर्णपणे पालन करू नाहीतर यापुढे मी साहेबांना अशी विनंती केली की, आपण तिसऱ्या पार्टीला सांगून सॅम्पल घ्यायला लावा. कारण शेवटी क्वॉलिटीसाठी आपली सगळी तयारी आहे. आपण जर औषध डायरेक्ट कंपनीकडून खरेदी करायचे असेल तर त्याला ही माझी तयारी आहे. माझा यात कुठलाही आग्रह नाही. कारण फक्त आपल्याला औषध घ्यायचे आहे.

**शरद पाटील :-**

सिपला कंपनी आणि दुसरी कंपनी ह्याच्यात एवढा फरक का? औषध, गोळी एकच आहे.

**डॉ. बावस्कर :-**

यामध्ये किंमतीमध्ये फरक येतो कारण ज्या मोठया कंपन्या आहेत त्याच्यामध्ये किंमतीमध्ये जवळ जवळ पन्नास टक्के फरक इतर ज्या कंपन्या मार्केटमध्ये किंवा ट्रेडींगमध्ये नसतात किंवा रिटेलमध्ये नसतात, ज्या स्ट्रीपमध्ये पॅकींग नसते, जार पॅकिंग आणि स्ट्रीप पॅकींग. औषधामध्ये फरक नसतो. परंतु सार्वजनिक ठिकाणी जर दहा गोळयांचे पॅकेट आपण विकत घेतले तर त्याची किंमत दहा रूपये येईल. परंतु याला जर आपण जारमध्ये घेतले व एका गोळीला जर एक रूपया किंमत असली तर जारमध्ये पॅकिंग जर शंभर गोळयांचे किंवा हजार गोळयांचे पॅकींग घेतले तर त्याची किंमत आपल्याला पन्नास टक्के किंवा चाळीस टक्क्यांनी कमी होईल. या पॅकींगचा खर्च मोठ्या कंपन्या असतील तर त्याचे ओव्हर हेडस् व टॅक्सेसचा खर्च या सगळया गोष्टी त्याच्यामध्ये असते. जसे कफ सिरप जर कफसिरपची बाटली मिळते साठ एम.एल. किंवा चाळीस एम.एल.ची आणि आपण जे कफसिरप घेतो. त्याचे आपण पाच लिटरचे जार घेतो कारण ते आपल्याला मोठया प्रमाणात डिस्ट्रीब्युट करावे लागते म्हणून आपल्याला ते परवडत नाही. म्हणून त्याची किंमत मोठया प्रमाणात कमी येते जे साडे चार लिटरचे किंवा पाच लिटरचे जार असतो किंवा एक लिटरची बाटली असते त्याच्यामध्ये पॅकिंग असल्यामुळे किंमती मोठया प्रमाणात कमी होतात. त्यामुळे ह्या कंपन्या ग्लॅक्सो किंवा सिपला या अशा कंपन्यांच्या किंमती फार मोठयाप्रमाणात असतात त्याची जवळ जवळ पन्नास टक्के किंमत ही आपल्याला अशी औषध उपलब्ध होतात आणि ही क्वॉलिटी चांगली मिळावी म्हणूनच आपण त्याचे सॅम्पल ह्या सगळया गोष्टी आपण करणार आहोत.

**धनराज अग्रवाल :-**

दोघांचे पॅकिंग एकच आहे वन पॉईट वन इन टू टेन.

**डॉ. बावस्कर :-**

त्याची एक्साईस ड्यूटी असेल किंवा त्याचे जे ओव्हर हेडस् असतील. आपले हे होलसेल याच्यामध्ये असल्यामुळे किंमतीमध्ये मोठया प्रमाणात किंमती कमी येतात आणि फरक येतो.

**धनराज अग्रवाल :-**

माझ्या मते ज्या कंपन्या हलक्या आहेत त्यांचे रेट कमी आहे आणि जी चांगली कंपनी आहे त्याचा रेट जास्त आहे.

**डॉ. बावस्कर :-**

आपले म्हणणे बरोबर आहे. परंतु हे जे पॅकिंग असते ते जार पॅकिंग असल्यामुळे किंमतीमध्ये बऱ्याचप्रमाणात फरक आहे.

**प्रकरण क्र.१९७ :-**

महानगरपालिका हद्दीत सुरू करावयाचे आरोग्य केंद्रासाठी लागणाऱ्या औषध खरेदीसाठी मागविलेल्या निविदेस मंजुरी देण्याबाबत.

**ठराव क्र. १७८ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील लोकसंख्या मागील काही वर्षापासुन मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. १ दशकाच्या लोकसंख्या वाढीचा विचार केल्यास १९९१- २००१ च्या दशकात महापालिका क्षेत्रातील लोकसंख्या १९६ टक्क्यांनी वाढली आहे. महानगरपालिकेच्य हद्दीत जिल्हा परिषद चालवित असल्याने भाईंदर प्राथमिक आरोग्य केंद्र व उत्तन प्राथमिक आरोग्य केंद्र या व्यतिरिक्त शासनाचे अथवा महानगरपालिकेची वैद्यकिय व आरोग्य सेवा उपलब्ध नाही. ही बाब विचारात घेऊन महानगरपालिका सर्व साधारण सभा दि. १९/४/२००३ विषय क्रमांक ५ ठराव क्र. ५ अन्वये महानगरपालिका हद्दीत खालील प्रमाणे एकुण सात आरोग्य केंद्र व एक फिरता दवाखाना सुरु करण्यास, त्यासाठी लागणारे कर्मचारी वर्ग करार पध्दतीने नेमण्यास व आरोग्य केंद्रासाठी लागणारी औषध व उपकरणे खरेदी करण्यास व त्यासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकिय व वित्तीय मंजुरी देण्यात आली आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | आरोग्य केंद्राची संख्या |
|---|---|---|
| १ | भाईंदर पुर्व | २ |
| २ | भाईंदर (प) | २ |
| ३ | उत्तन | १ |
| ४ | मिरारोड | १ |
| ५ | काशीमिरा | १ |

वरील आरोग्य केंद्रासाठी लागणारी औषधे व उपकरणे खरेदी करण्यास वृत्तपत्रात दि. ६/८/२००३ रोजी जाहिरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या त्यास योग्य प्रतिसाद मिळाला नाही म्हणुन निविदेस मुदत वाढ देण्यात आली होती. यास प्रतिसाद म्हणुन विहित मुदतीत १. श्रेयस डिस्ट्रीब्युटर्स, जव्हार नगर, गोरेगाव, मुंबई. २. मनिषा मेडिकोस भाईंदर (प) ३. गॅल्फ लॅबोरेटरीस, कांदिवली मुंबई. ४ आकांक्षा डिस्ट्रीब्युटर्स, दहिसर मुंबई. ५. गगन फार्मा, कांदिवली मुंबई. ६. महालक्ष्मी मार्केटींग कंपनी, उल्हासनगर या निविदाकारांनी निविदा सादर केल्या आहेत. यापैकी महालक्ष्मी मार्केटींग कंपनी यांनी महापालिकेच्या मुळ निविदा पत्रकावर खोडा खोड करुन त्यावर कागद चिटकुन दर भरलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या निविदेचा विचार करण्यात आलेला नाही.

आलेल्या निविदांचा सविस्तर तुलनात्मक अभ्यास करुन निविदाकारांना निवेदीत दिलेले दर औषध उत्पादक कंपनी, ते उत्पादीत करीत असलेल्या औषधांची बाजारातील उपलब्धता, कंपनीचा यापुर्वीचा अनुभव इत्यादी बाबी विचारात घेऊन औषध खरेदीसाठी खालील प्रमाणे शिफारस करण्यात आलेली आहे. त्यास ही समिती मंजुरी देत आहे.

श्रेयस डिस्ट्रीब्युटर्स बाब क्र. :-

२१, ४५, ४९, ५३, ५५, ६१, ६९, ७०, ७६, ८०, ८४, ८९, ९२, ९६, १०२, १०९, १११, ११२, १२३, १२५, १२६, १२७, १२८, १३०, १३७, १४१, १५२, १५३, १५४, १५५, १६६, १६७, १७२, १७४, १८३.

मनिषा मेडीकोस बाब क्र. :-

१, २, ४, ५, ६, ७, ९, १०, १२, १३, १५, १६, १७, १९, २५, २६, ३०, ३१, ३२, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ४२, ४३, ४६, ४७, ५०, ५१, ५६, ६२, ६४, ६५, ६७, ७१, ७२, ७३, ७४, ७५, ७९, ८१, ८२, ८३, ८५, ९३, ९४, ९५, ९८, ९९, १०१, १०५, ११०, ११६, ११७, १२४, १३१, १३४, १३५, १३६, १३८, १३९, १४०, १४२, १४३, १४४, १४५, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५१, १५९, १६०, १६१, १६२, १६४, १६५, १६८, १७०, १७७, १७८, १८४,१८५.

गॅल्फा लॅबोरेटरीस बाब क्र. :-

८, १८, ५७, ६३, ६६, ६८, ७७, ७८, ८८, १३२, १३३, १७३

गगन फार्मा बाब क्र. :-

११, २०, २३, २४, ४४, ५२, ५९, ८७, ९१, ९७, १००, १०३, १०४, १०६, १०७, १०८, ११३, ११४, ११५, ११८, ११९, १२०, १२१, १२२, १२९, १५७, १५८, १६३, १६९, १७१, १७५, १७६, १७९, १८०, १८१.

आकांक्षा डिस्ट्रीब्युटर्स बाब क्र. :-

३, १४, २२, ४८, ५४, १५६.

जर कमी दराच्या निविदाकारांनी औषधांचा पुरवठा विहिती मुदतीत केला नाही तर खालील नमुद केल्याप्रमाणे व्दितिय क्रमांकाच्या निविदाकारांचे औषधे खरेदी करण्यात येतील व यासाठी येणारा जास्त खर्च प्रथम निवड केलेल्या निविदाकारांचे निविदा अनामत रक्कम व महानगरपालिका देय असलेल्या बिलातुन वसुल करण्यात यावा.

श्रेयस डिस्ट्रीब्युटर्स बाब क्र. :-

१, २, ४, ५, ८, १२, १३, १६, २०, २४, २५, ३०, ३१, ३४, ३५, ३६, ३७, ३८, ३९, ४१, ४६, ५६, ६२, ६५, ७१, ७२, ७३, ७५, ८१, ८२, ८३, ८५, ९१, ९४, ९५, ९७, ९८, १०३, १०५, ११०, ११४, ११५, १३१, १३३, १३६, १३९, १४२, १४३, १४४, १५१,१६०, १६१, १६२, १६३, १६९, १७०, १७६, १७७, १७९.

मनिषा मेडीकोस बाब क्र. :-

३, ११, १४, १८, २१, २२, ४४, ४५, ४८, ५२, ५४, ५५, ५७, ६३, ७६, ७७, ७८, ८७, ८८, १००, १०४, १०६, १०७, १०८, ११३, ११८, १२९, १३७, १५२, १५३, १५७, १५८, १७३, १८०, १८३.

गॅल्फा लॅबोरेटरीस बाब क्र. :-

१९, ४२, ५१, ६७, ७९, ८४, १३४, १३५, १६४, १६६.

गगन फार्मा बाब क्र. :-

९, १०, २६, ४३, ४७, ४९, ५०, ५३, ६१, ६४, ६५, ६८, ७४, ८९, ९३, ९६, ९९, १०१, १०९, ११२, ११६, ११७,१२४, १३०, १३२, १३८, १४०, १४९, १५६, १५९, १६५, १६७, १६८, १७२, १७४, १७८, १८४, १८५.

आकांक्षा डिस्ट्रीब्युटर्स बाब क्र. :-

६, ७, १५, १७, ५९.

वरील सर्व बाबींचा विचार करून महानगरपालिका हद्दीत नव्याने सुरु करावयाच्या आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असणारी औषाधे निविदाकारांकडुन त्यांचे नावा समोर शिफारस केलेल्या बाबींनुसार शिफारस केलेल्या दराने आवश्यकते नुसार खरेदी करणेस व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे रुपये २० लाख खर्चास मा. स्थायी समिती मंजुरी देत आहे.

सन २००३-०४ चे वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात औषधे व उपकरणे खरेदीसाठी रुपये २५ लाख एवढ्या रक्कमेची तरतुद मंजुर करण्यात आलेली आहे. सदर निविदेची मुदत मंजुरी पासुन १ वर्षासाठी ठेवण्यात मंजुरी देण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९८ चे वाचन केले.)

**चंद्रकांत वैती :-**

औषधांना मंजुरी मिळाल्यानंतर आणि या शहराला आपण निरोगी शहर बनविण्याचे स्वप्न या शहराला दाखवलेले आहे. महानगरपालिकेला अनुसरून आपण डॉक्टर आणि नर्सेस, वॉर्डबॉय इत्यादींच्या मुलाखती मा. आयुक्त साहेब यांच्या उपस्थितीत झालेल्या आहेत आणि या शिफारशी झालेल्या नियुक्त्यांना मंजुरी देणेबाबतचा विषय आलेला आहे आणि महानगरपालिकेच्या हद्दीत सुरू करावयाचे आरोग्य केंद्र करारपद्धतीने कर्मचारी वर्ग नियुक्त करायचे आहे ते ह्याच्यासाठी ते करारनामे आपण प्रत्यक्ष करावे आणि त्यात अटीशर्ती घालून आणि त्याचे पुढे देखील योग्य ते पालन करावे अन्यथा ते ड्रायव्हर सारखा प्रसंग ओढवेल. तर असा प्रसंग ओढवू नये. म्हणून योग्य ते करार प्रत्येकाबरोबर करून हा ठराव मी मांडत आहे.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, हा जो ठराव आणलेला आहे त्यात सहा महिन्याच्या कालावधीकरीता नेमणूक स्थायी समितीसमोर करतोय. सहा महिने गेल्यानंतर परत २४० दिवस गेल्यानंतर हा असाप्रकार येथे झालेला आहे. २४० दिवसानंतर त्यांना तुम्हाला परमनन्ट करावे लागेल किंवा ते कोर्टात जाईल आणि आपल्यासाठी ते उलटी बाब होणार आहे. सहा महिन्यानंतर तुम्ही त्याचे काय करणार आहात. त्यांना आपण टेम्पररी ठेवले आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

आपण त्यांना टेम्पररी ठेवलेले आहे. सहा महिन्यासाठी.

**दिनेश नलावडे :-**

सभापती महोदय, आपण १९७ या विषयाला मान्यता दिलेली आहे आणि१९८ हा विषय त्याच्या संबंधी विषय आहे आणि सन्मा. सदस्य धनराजजी अग्रवालजी यांनी जो प्रश्न विचारला आहे त्याला उत्तर दिले पाहिजे या मताशी मी आहे. पण आता सन्मा. सदस्य चंद्रकांत वैतीजी यांनी जो ठराव मांडला आहे त्याला मी अनुमोदन देत आहे आणि आपल्या प्रश्नाला डॉक्टर बावस्कर साहेब हे उत्तर देतील.

**डॉ. बावस्कर :-**

मा. सभापती साहेब, मा. अग्रवाल साहेबांनी जो प्रश्न केलेला आहे तो अगदी योग्य आहे आणि ह्यामध्ये आज आपण सहा महिन्यासाठी फक्त नियुक्ती करून चालणार नाही. आज आपण दवाखाना सुरू केल्यानंतर नेहमीसाठी आपल्याला स्टाफ, डॉक्टर आणि नर्सेस आवश्यक असतील. आपण आज दवाखाना सुरू केल्यानंतर उद्या बंद करू शकणार नाही किंवा एखादी फॅसिलीटी सुरू केल्यानंतर तीला बंद करता येणार नाही. ही पदे करारपद्धतीने आपण एवढयासाठीच घेत आहोत की, सहा महिन्याकरिता नेमणूका केल्यानंतर सहा महिन्यात शासनाकडून या पदासाठी परवानगी मिळवायची आहे आणि शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर यामध्ये जे समाधानकारक काम करत असतील व त्यांचे काम चांगले असेल अशा लोकांचा विचार आपल्याला पुढे करता येईल. सहा महिन्याच्या मुदतीनंतर आपल्याला हे प्रकरण जर तोपर्यंत शासनाकडून मंजुरी मिळाली नाही तरी हे करारपद्धतीने आहे,

तात्पुरत्या स्वरूपाचे आहे आणि ह्याचे करारनामे आपण करून घेणार आहोत. सहा महिन्याच्या नंतर आपण त्यांना ब्रेक देउन त्यांची रि-अपॉईटमेंट करणार आहोत. त्याच्यामुळे २४० दिवसाचे येत नाही आणि शासनाचा नियम आहे सलग एका वर्षामध्ये २४० दिवस भरल्यानंतर सेवेत घेण्यासाठी विचार करण्यात यावा आणि कायम करणे हा वेगळा विषय आहे. परंतु जर एकदा करारनामा करून घेतला स्टॅम पेपरवर व ह्यांना आपण स्पष्टपणे करारपद्धतीने म्हणणार आहोत आणि त्या २४० दिवसाचा विचार केला जाणार नाही किंवा त्याचा आग्रह धरणार नाही. त्यामध्ये आपण असा उल्लेख करणार आहोत आणि असे करारनामे यापुर्वी मी करून घेतले आहे. छत्रपती शिवाजी महाराज रूग्णालय किंवा राजीव गांधी वैद्यकिय महाविद्यालयाच्या नेमणूकीसाठी असे करारनामे केलेले आहे आणि आजही ते त्या ठिकाणी करारपद्धतीनेच काम करत आहेत. त्याच पद्धतीने आपण येथे ही करून घेणार आहोत. शासनाची मंजुरी मिळाल्यानंतर मात्र ह्यातले जे समाधानकारक काम करणारे लोक असतील त्यांचा आपण नक्कीच विचार करू या आणि तिच बाब विचारात घेउन यामध्ये अनुशेषदेखील विचारात घेतलेले आहे की, पुढे आपले जसे इंजिनिअरचे झाले तसे होउ नये. म्हणून आपण ती बाब विचारात घेउन त्यांचे क्वॉलिफिकेशन बघितले, अनुशेष बघितले आहे, सगळया गोष्टींचा आपण विचार केलेला आहे.

**धनराज अग्रवाल :-**

करारनामा केल्यानंतर तसा नियम लागू होत नाही. मग सहा महिने कशाला? आपण बारा महिने करा.

**डॉ. बावस्कर :-**

मा. स्थायी समितीचे अधिकार सहा महिन्यासाठी आहे. मा. स्थायी समितीला जे अधिकार आहेत तेवढ्याच मर्यादेकरिता हे प्रकरण आलेले आहे. मा. स्थायी समितीला हे प्रकरण आपल्याला पुढच्यावेळेला मा. महासभेमध्ये आपल्याला पाठवावे लागणार आहे आणि म्हणूनच मी म्हटले आहे की, पुढे ही मुदत संपल्यानंतर यापैकी ज्यांचे काम समाधानकारक असेल त्यांची पुढची मुदत वाढवण्यासाठी मा. महासभेस स्थायी समितीने शिफारस करण्यात यावी असे विनंती करण्यात येईल.

**शरद पाटील :-**

तुम्ही जे आता बोललात की, त्यांना ब्रेक देउन परत त्यांची मुदतवाढ करायची असे झाले पाहिजे.

**डॉ. बावस्कर :-**

होय, तसेच राहणार आहे आणि आपण ॲग्रीमेंटदेखील तसेच करणार आहोत.

**मिलन म्हात्रे :-**

आपण जे डॉक्टर घेतले आहेत त्यांचे क्वॉलिफिकेशन काय आहे?

**डॉ. बावस्कर :-**

होय, सर्व डॉक्टरर्स एम.बी.बी.एस. पदवीधर आहेत. व प्रत्येक डॉक्टरर्सचे क्वॉलिफिकेशन चेक करून घेतले आहे. व त्यांचे मेडीकल कौन्सीलरचे सर्टीफिकेट बघितलेले आहे.

**याकुब कुरेशी :-**

डॉक्टर साहेब त्यांची डिग्री खरी आहे का?

**डॉ. बावस्कर :-**

डिग्री तपासायला पाठवू.

**याकुब कुरेशी :-**

तपासायला पाठवू नाही तपासायला पाठवाच. त्यांची डिग्री खरी आहे का नाही हे तपासूनच त्यांची नेमणूक करा.

**डॉ. बावस्कर :-**

त्यांचे ओरीजनल सर्टीफिकेट बघितले आहे. व हजर होताना आपण पुन्हा ओरीजनल सर्टीफिकेट बघत असतो त्यावेळेला आपण खात्री करून घेउ.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती साहेब, आपल्या शहरातील काही लोकल डॉक्टर वेल्फेअरतर्फे सेवा द्यायला तयार आहेत. ते बोलले नगरपालिकेच्या डिसपेन्स-या चालू झाल्यावर तास दिड तास ते सेवा द्यायला तयार आहेत. ते आपल्याला हॉनरली सर्व्हिस देणार आहेत. त्यांना तुमच्याकडून काही नको आहे.

**आसिफ शेख :-**

जे असे काम करायला तयार आहेत त्यांना आपण पत्र देउन टाका.

**याकुब कुरेशी :-**

मा. सभापती साहेब, आपण ह्याच्या ही पलीकडे जाउन आपण असे कॅम्प लावावे कारण जर आपल्याला डॉक्टर असे फ्री सर्व्हिसमध्ये मदत देत असतील तर त्यांना बोलवायला काय हरकत आहे?

**मिलन म्हात्रे :-**

आपल्या येथील जे डॉक्टर आहेत ते स्वतः हून पुढे यायला तयार आहेत.

**मा. सभापती :-**

आपल्याला भाईंदरमधील कुठलेही डॉक्टर सहकार्य करत असतील तर आपल्या कार्यालयामध्ये आपण कॅम्प लावू शकतो.

**याकुब कुरेशी :-**

आपण या ठरावामध्ये तसे नमुद करून घ्या.

**डॉ. बावस्कर :-**

ठिक आहे.

**प्रकरण क्र.१९८ :-**

महानगरपालिका हद्दीत सुरू करावयाचे आरोग्य केंद्रासाठी करार पद्धतीने कर्मचारी वर्ग नियुक्त करणेबाबत.

**ठराव क्र. १७९ :-**

महानगरपालिका हद्दीत तत्कालीन नगरपालिका परिषद व महानगरपालिकेच्या स्थापने नंतर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना वैद्यकिय सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी सोयी सुविधा नव्हत्या महानगरपालिका हद्दीतील सद्याची व भविष्यातील वाढती लोकसंख्या विचारात घेऊन मा. महानगरपालिका सर्व साधारण सभा ठराव क्र. ५ दि. १९/४/२००३. अन्वये एकुण खालील प्रमाणे एकुण सात आरोग्य केंद्र एक फिरता दवाखाना सुरु करण्यास व त्यासाठी लागणारा कर्मचारी वर्ग करार पध्दतीत नियुक्ती करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | विभागाचे नाव | आरोग्य केंद्राची संख्या |
|---|---|---|
| १ | भाईंदर पुर्व | २ |
| २ | भाईंदर (प) | २ |
| ३ | उत्तन | १ |
| ४ | मिरारोड | १ |
| ५ | काशीमिरा | १ |

सदर आरोग्य केंद्रासाठी खालील जागांची निवड करण्यात आली आहे. १) महापालिका जुने कार्यालय २) गणेश देवल व जय अंबे नगर समाज कार्यालय ३) केबीन रोड नाका, भाईंदर (पुर्व) रेल्वे पादचारी पुला खाली ४) नवघर महापनगरपालिका शाळा व बंदर वाडी शाळा ५) नयानगर, मिरारोड, अस्मिता सुपर मार्केटचे पहिल्या मजल्यावर मा. उपमहापौर यांचे जागेत. ६) काशी, उर्दु शाळा व पेणकरपाडा. ७) उत्तन विभाग अद्याप जागा ठरलेली नाही.

वरील आरोग्य केंद्र सुरु करण्यासाठी खालीलप्रमाणे वैद्यकिय व निमवैद्यकिय कर्मचारी करार पध्दतीने नेमणुक करावयाचे आहेत.

| अ.क्र. | पदांचे नाव | पदसंख्या |
|---|---|---|
| १ | वैद्यकिय अधिकारी | ८ |
| २ | एन.एम / परिचारीका | ८ |
| ३ | ए.एन.ए म / प्रसविका | २१ |
| ४ | फार्मासीस्ट कम लिपिक | ८ |

वरील पदावर नियुक्तीसाठी दैनिक सकाळ, दैनिक सागर, दैनिक सुरज प्रकाश, या वृत्तपत्रात जाहिराती प्रकाशीत केल्या व इच्छुक पात्र उमेदवारांनां दि. २२/८/२००३ रोजी थेट मुलाखातीस बोलाविण्यात आले होते. सदर पदावर करार पध्दतीने नेमणुकीसाठी जाहिरात देताना प्रत्येक पदासाठी शासकीय नियमानुसार मागसवर्गीय उमेदवारांसाठी आरक्षण विचारात घेण्यात आले आहे. पात्र उमेदवारांच्या मुलाखाती मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ५४ (१) नुसार खालील प्रमाणे गठीत केलेल्या निवड समितीकडुन घेण्यात आल्या.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. आर.डी.शिंदे | महापालिका आयुक्त | अध्यक्ष |
| २ | श्री. कल्याण केळकर | महापालिका उपआयुक्त (मुख्यालय) | सदस्य |
| ३ | श्री. शिवमुर्ती नाईक | महापालिका उपआयुक्त | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | श्री. डॉ. बी.एस.बावस्कर | विशेष कार्यअधिकारी विभागप्रमुख आरोग्य | सदस्य |
| ५ | श्री. नाकाडी | मुख्य लेखापरीक्षक | सदस्य |
| ६ | श्री. राजकुमार कांबळे | मागासवर्गी प्रतिनिधी अधिकारी | सदस्य |

वरील निवड समितीने थेट मुलाखातीसाठी उपस्थित असलेल्या उमेदवाराच्या मुलाखती घेऊन खालीलप्रमाणे शिफारस करण्यात आलेली आहे. त्यास ही स्थायी समिती मंजुरी देत आहे.

**१. वैद्यकिय अधिकारी एकुण पदे - ८ मासिक ठोक पगार रु. १०,०००/-**

या पदासाठी एकुण १९ उमेदवार हजर होते.

. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता अनुभव व गुणवत्ता विचारात घेऊन निवड समितीने खालील प्रमाणे उमेदवारांच्या नेमणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | डॉ. चंद्रशेखर कांबळे | अनुसुचित जाती |
| २ | डॉ. हेमंत सुर्यवंशी | अनुसुचित जमाती |
| ३ | डॉ. मंगलसिंग परदेशी | विमुक्त जाती |
| ४ | डॉ. अंजली पाटील | इतर मागासवर्ग |
| ५ | डॉ. आनंद सोनटके | खुला / मुक्त |
| ६ | डॉ. रत्नप्रभा पिसळ | खुला / मुक्त |
| ७ | डॉ. प्रमोद पडवळ | खुला / मुक्त |
| ८ | डॉ. नंदकिशोर लहाने | खुला / मुक्त |

खालील उमेदवारांची त्या त्या संवर्गानुसार प्रतीक्षा यादी वर ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | डॉ. तुषार मसुरकर | अनुसुचित जाती |
| २ | डॉ. लवेश जाधव | अनुसुचित जाती |
| ३ | डॉ. मनिषा महाले | अनुसुचित जमाती |
| ४ | डॉ. वंदना पाटील | विमुक्त जाती |
| ५ | डॉ. अंजली पिंपळे | विमुक्त जाती |
| ६ | डॉ. मकरंद नाईक | खुला /विमुक्त |
| ७ | डॉ. नियुक्ता ठाकरे | खुला /विमुक्त |
| | | |

**२. एन.एम/ परिचारीका एकुण पदे - ८ मासिक ठोक वेतन रु. ४,५००/-**

या पदासाठी एकुण ३९ उमेदवार हजर होते. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता अनुभव व गुणवत्ता विचारात घेऊन निवड समितीने खालील प्रमाणे उमेदवारांच्या नेमणुकीस शिफारस केलेली आहे. त्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | सातवे ज्योती संतोष | अनुसुचित जाती |
| २ | कोम ललिता अनिल | अनुसुचित जमाती |
| ३ | पडवले निलम मदन | अनुसुचित जमाती |
| ४ | जाधव सारिका रुमदेव | विमुक्त जाती |
| ५ | चुरी मेघना दशरथ | इतर मागासवर्ग |
| ६ | दळवी रसिका राजेंद्र | खुला / मुक्त |
| ७ | कार्वल लिटा इलिस | खुला / मुक्त |
| ८ | तेरडे मीना राजेश | खुला / मुक्त |
| | | |

खालील उमेदवारांची त्या त्या संवर्गानुसार प्रतीक्षा यादी वर ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | देवळेकर शंकुतला एन. | अनुसुचित जाती |
| २ | वेताळे जागृती गणपत | अनुसुचित जाती |
| ३ | संखे रुचिता नारायण | विमुक्त जाती |
| ४ | संखे प्रतिक्षा तुकाराम | विमुक्त जाती |
| ५ | भाबल शुभागी सदाशिव | इतर मागासवर्ग |
| ६ | बेर्डे पुष्पा गंगाराम | इतर मागासवर्ग |
| ७ | हेन्ड्रीक्स जॉयसी जॉन | खुला / मुक्त |
| ८ | दरेकर रुपाली गणपत | खुला / मुक्त |
| ९ | शेट्टी रेश्मा बाळकृष्ण | खुला / मुक्त |

**३. प्रसविका /ए.एन.एम एकुण पदे - २० मासिक ठोक पगार रु. ३०००/-**

एन.एम / परिचारीका संवर्गसाठी मुलाखती घेत असताना मुलाखतीत त्यांची ए.एन.एम या खालच्या पदावर काम करण्याची तयारी आहे काय? याबद्दल विचारणा करण्यात आली असता खालील उमेदवारांनी ए.एन.एम पदावर काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. त्यातील गुणवत्ता यादीत जे

उमेदवार बसतात त्यांची नावे ए.एन.एम या पदावर करार पध्दतीने तात्पुरत्या कालावधीसाठी नेमणुकीस मंजुरी देण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| १ | भाबल शुभांगी सदाशिव |
| २ | देवळेकर शंकुतला एन. |
| ३ | शेट्टी रेश्मा बाळकृष्ण |
| ४ | दरेकर रुपाली गणपत |
| ५ | वेताळे जागृती गणपत |

ए.एन.एम / प्रसविका या पदावर खुल्या वर्गातुन फक्त ११ उमेदवार मुलाखतीसाठी हजर होते त्यातील गुणवत्ता यादी नुसार असलेली उमेदवार व एन.एम पदासाठी वर उल्लेख केलेल्या उमेदवाराच्या गुणवत्ता यादी नुसार विचार करुन खालील प्रमाणे उमेदवारांना ए.एन.एम / प्रसविका या पदावर करार पध्दतरने तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीसाठी मंजुरी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | चव्हाण सिमा अनिल | अनुसुचित जाती |
| २ | पवार शितल जालिंदर | अनुसुचित जाती |
| ३ | कोकणी उषा गुलाब | अनुसुचित जमाती |
| ४ | महाले अरुणा रामचंद्र | अनुसुचित जमाती |
| ५ | ठाणकर सरीता देवजी | अनुसुचित जमाती |
| ६ | पवार कमल नारायण | अनुसुचित जमाती |
| ७ | शिंगाडे संध्या रामचंद्र | अनुसुचित जमाती |
| ८ | पागधरे प्रिया कृष्णा | विशेष मागास प्रवर्ग |
| ९ | हिंदळेकर मनिषा अर्जुन | इतर मागासवर्ग |
| १० | चव्हाण प्रमोदिनी बी. | खुला / मुक्त |
| ११ | देसाई प्रमिला मारुती | खुला / मुक्त |
| १२ | पठाण परिदा जमिरखान | खुला / मुक्त |
| १३ | खामकर स्नेहल सुधिर | खुला / मुक्त |
| १४ | भाबल शुभांगी सदाशिव | खुला / मुक्त |
| १५ | देवळेकर शंकुतला एन. | खुला / मुक्त |
| १६ | शेट्टी रेश्मा बाळकृष्ण | खुला / मुक्त |
| १७ | दरेकर रुपाली गणपत | खुला / मुक्त |
| १८ | वेताळे जागृती गणपत | खुला / मुक्त |

मुलाखतीच्या वेळी विमुक्त जातीचे उमेदवार उपलब्ध नसल्याने शासकिय नियमानुसार गुणांनुक्रमे खालील दोन उमेदवारांची विमुक्त जातीचे जागेवर फक्त सहा महिन्यासाठी नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १९ | भोंगाडे पदमा साधुजी | अनुसुचित जाती (विमूक्त जातीचे पदावर) |
| २० | मळावी विद्या प्रितम | अनुसुचित जमाती (विमूक्त जातीचे पदावर) |

खालील उमेदवारांची सदर संवर्गात २ प्रतीक्षा यादी वर ठेवण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | गमरे दक्षता शिवराम | अनुसुचित जाती |
| २ | मोकल निलिमा एस | इतर मागासवर्ग |
| ३ | पोतदार अश्वीनी अजीत | इतर मागासवर्ग |
| ४ | देवळेकर समिधा संजय | इतर मागासवर्ग |
| ५ | चेरीयन सिनी | खुला / मुक्त |
| ६ | सावंत जयश्री बाळासाहेब | खुला / मुक्त |
| ७ | चव्हाण शालीनी रघुनाथ | खुला / मुक्त |
| ८ | पवार संधेना सखाराम | खुला / मुक्त |

४. **फार्मासीस्ट तथा लिपिक एकुण पद - ८ मासिक ठोक वेतन रु. ३,५००/-**

या पदासाठी एकुण २१ उमेदवार

हजर होते. उमेदवाराची शैक्षणिक पात्रता अनुभव व गुणवत्ता विचारात घेऊन निवड समितीने खालील प्रमाणे उमेदवारांच्या नेमणुकीस मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | घुले नरेंद्र कडु | अनुसुचित जाती |
| २ | चव्हाण विलास मेघराज | विमुक्त जाती |
| ३ | भोईर राहुल गजानन | इतर मागासवर्ग |
| ४ | करंडे सचिन महादेव | खुला / मुक्त |
| ५ | कोटले रुपाली अच्युतराव | खुला / मुक्त |
| ६ | चौधरी कामिनी भास्कर | खुला / मुक्त |
| | | |

खालील उमेदवारांची त्या त्या संवर्गानुसार प्रतीक्षा यादी वर ठेवण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | संवर्ग |
|---|---|---|
| १ | थोरात प्रकाश मंच्छींद्र | अनुजाती |
| २ | मोरे वैशाली रमेश | अनुजाती |
| ३ | किंजें ललित बरसु | इतर मागासवर्ग |
| ४ | पवाले सुधिर रामभाऊ | इतर मागासवर्ग |
| ५ | रितपुरे इश्वरप्रसाद | खुला / मुक्त |
| ६ | कशिद संतोष महोन | खुला / मुक्त |
| ७ | हन्साळे किशोर देविदास | खुला / मुक्त |

मुलाखतीच्या वेळी अनुसुचित जमातीचे उमेदवार उपलब्ध नसल्याने शासकिय नियमानुसार गुणांनुक्रमे खालील दोन उमेदवारांची अनुसुचित जमातीच्या जागेवर फक्त सहा महिन्यासाठी नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| ७ | इंगळे आनंद श्यामराव | अनुसुचित जाती (अनुसुचित जमातीचे पदावर) |
| ८ | धुमाळे संजीव कुमार | अनुसुचित जाती (अनुसुचित जमातीचे पदावर) |

तरी महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी सुरु करावयाच्या आरोग्य केंद्रासाठी वरीलप्रमाणे कर्मचारी वर्ग मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ (१) अन्वये सहा महिन्याच्या कालावधीसाठी नेमणुकीस ही स्थायी समिती मंजुरी देत आहे. महानगरपालिका हद्दीत सुरू करावयाच्या आरोग्य सेवासाठी सहा महिन्यानंतरही पुढील काळासाठी कर्मचारी वर्गाची आवश्यकता भासणार आहे. मा. स्थायी समितीने दिलेली सहा महिन्याची मुदत संपल्यानंतर ज्या कर्मचा-यांचे काम समाधानकारक असेल त्या कर्मचा-यांना मुदतवाढीसाठी मा. महापालिका सर्वसाधारण सभेस मा. ही समिती शिफारस करीत आहे.

**सुचक :- श्री. दिनेश नलावडे.** **अनुमोदन :- श्री. मिलन वसंत म्हात्रे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. १९९ चे वाचन केले.)

**आसिफ शेख :-**

प्रकरण क्र. १९९ बंदरवाडी (खारी) स्मशानभुमीत स्वखर्चाने विविध विकास कामे करण्याबाबत परहीत सेवा संघ यांच्या आलेल्या प्रस्तावाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे हा विषय विषयपटलावर आलेला आहे आणि परहीत सेवा संघ या संस्थेमार्फत मला वाटते आपल्या सभागृहातील प्रत्येक सदस्य आणि सर्व पदाधिकारी आणि अधिकारी वर्ग यांना चांगली कल्पना आहे, अनुभव आहे. चांगले काम या परहीत संघाने या संस्थेने केलेले आहे आणि त्याचे उदाहरण आपल्या समोरच आहे. त्यांनी बंदरवाडी (खारी) चे स्मशान भुमीचे त्यांनी अत्यंत चांगल्याप्रकारे विकसित केलेले आहे आणि जेव्हा बाहेरचे लोक देखील अंतयात्रेला आपल्या याठिकाणी येतात तेव्हा ते भरपुर तारीफ करतील आणि चांगले काम चांगली स्मशानभुमी सुशोभित केलेली आहे. तसेच चांगले काम करणा-या संस्थेस या ठिकाणी त्यांनी मागणी केलेली आहे की, आणखीन आपल्या ठिकाणी जे खारीचे स्मशान भुमीमध्ये तळमजल्यावर महिला उद्योग केंद्र नंबर वन आणि नंबर टू वर व्यायाम शाळा आणि नंबर तीन वर सुलभ शौचालय बांधणेसाठीचा प्रस्ताव याठिकाणी आलेला आहे. तर मला वाटते याला कोणाचीही हरकत नसावी. सगळयांनी काम पाहिलेले आहे. तर मी याठिकाणी ठराव मांडू इच्छितो.

**याकुब कुरेशी :-**

ठराव मांडण्याच्या अगोदर मला एक शंका त्या शंकेचे आधी निरसन व्हावे अशी मी विनंती करतो.

**चंद्रकांत वैती :-**

परहीत संघाने स्मशानभुमी विकसित केली ते ठिक आहे. हे स्मशानभुमीमध्ये नाही आहे. ही प्रॉपटी महानगरपालिकेची आहे आणि तिथे समाजमंदिर आहे आणि तिथे आपण प्रत्यक्षात पाहिले तर तळमजल्यावर महिला उद्योग केंद्र, व्यायाम शाळा, सुलभ शौचालय म्हणजे व्यापारीकरण होत आहे. आताच आपण कर्मचाऱ्याना जेव्हा निवास देण्याचा प्रश्न आला तेव्हा आपण फार मोठी चर्चा केली आणि ही महानगरपालिकेची जागा आहे. उद्या फायरबिग्रेडची एखादी गाडी आपल्याला तिथे उभी करता येईल, आपली वाहने उभी करता येईल, कर्मचाऱ्याना निवास स्थाने उभी करता येईल, आरोग्य खात्यासाठी गोडाउन बांधता येतील म्हणजे ती फार चांगली जागा आहे आणि आपण असा काही चुकीचा निर्णय घेउन आपण महापालिकेच्या आजच्या अस्तित्वात असलेली मालमत्ता आहे. त्यात काही चुक करू नये.

**मिलन म्हात्रे :-**

सभापती महोदय, हा जो २७८ चा उल्लेख केलेला आहे हा ठराव कशाकरिता दिला आहे ते मी वाचून दाखविता. (ठरावाचे वाचन केले) ह्याच्यामध्ये फक्त सरपण आणि जे स्मशान डेव्हलप करायचे आहे त्याच्याकरिता हा २७८ क्रमांकाचा ठराव आपण उहारणार्थ दिलेला आहे ह्या गोषवाऱ्यामध्ये. त्याच्याबाहेर आपण जाउ शकत नाही. हा ठराव जो दिला आहे तो त्या परहीत संस्थेने जर त्या स्मशान भुमीत एखादे कॅन्टीन काढले तर तुमची ती कंडीशन ह्या ठरावाला बीच ऑफ कंडीशन असेल. सभापती साहेब २७८ मध्ये कुठेही असे कमर्शियल प्रोव्हीजन या ठरावात नाही आहे. ती कॉपी माझ्याकडे आहे. मुद्दामुन मी मागच्या सभेमध्ये होतो त्यावेळेला काढून घेतले होते कारण हा विषय सन्मा. सदस्य प्रफुल्ल पाटील साहेब अध्यक्ष असताना हा विषय सभेमध्ये आला होता. पण ह्याच्यामध्ये असे कुठेही कमर्शियल प्रोव्हीजन कुठेही नाही. त्याकरिता या ठरावाचा ह्यांनी उल्लेख केला आहे आणि सुचक हॅरल बोर्जीस होते आणि अनुमोदन सुशिला कोंत्या. त्याच्यामध्ये त्यांनी २७८ चा उल्लेख केलेला आहे. तर या ठरावावर आमचे स्वतः चे असे मत आहे, या ठरावाच्या विरोधात मी बोलतोय, आपण त्या ठिकाणी वैती साहेबांनी जे जे सांगितले आरोग्य विभाग, फायर ब्रिगेड कारण सेन्टर इंडस्ट्रीच्या सेन्टरमध्ये आहे. संस्थेला आपण पुर्वीच्या चांगल्या भावाने, सद्विवेक भावाने चांगले सोशल काम करण्याकरिता जागा दिली. ते नगरपालिकेचा चांगला पार्ट झाला पण आता त्या संस्थेची व्यापारी बुद्धी जागी झालेली दिसते. कारण एवढी मोक्याची जागा आता महिला, गृहउद्योग, व्यायाम शाळा यासाठी घेतले आहे ते चुकीचे आहे. आपण हा ठराव फेटाळून लावावा आणि नगरपालिकेच्या स्वतःच्या गरजांकरिता आपल्या ज्या सर्व सुविधा आहेत त्याच्याकरिता ह्या जागेचा वापर करावा आणि तसे प्रशासनाकडून तुम्ही अहवाल मागून ह्याच्यावर काहीकरिता येईल का? त्याकरिता सुरूवात करा.

**धनराज अग्रवाल :-**

सभापती महोदय, ह्यांनी पहिले काम केलेले आहे आणि ही चांगली संस्था आहे. सगळयांनी त्याची प्रेस गेलेली आणि जर त्यांना हे काम करायचे असेल तर त्याच्यासाठी तुमच्याकडे दुसरा पर्याय आहे का? जर ही जागा त्यांना द्यायची नसेल आणि दिली तर आमचा विरोध नाही.

**मा. सभापती :-**

गेल्या वेळेस सन्मा. सदस्य अनंत पाटील साहेबांनी देखील ती जागा व्यायाम शाळा चालविण्यासाठी मागितलेली आहे आणि त्याच्याकरिता आपल्याला निर्णय घ्यायचा आहे की, कसे भाडयाने द्यायचे, कुठल्या पद्धतीने द्यायचे.

**धनराज अग्रवाल :-**

ती जागा तुम्हाला द्यायची नाही का?

**मा. सभापती :-**

आपल्या कर्मचाऱ्यांसाठी जागा नाही तर त्यांना कुठे जागा द्यायची.

**आसिफ शेख :-**

सभापती साहेब, या ठिकाणी प्रशासनामार्फत जी टिपणी आपल्याला सादर करण्यात आलेली आहे. तर त्यात त्यांनी म्हटले आहे की, परहीत सेवा संघ यांच्यासोबत यापुर्वी झालेल्या कारारनाम्याची प्रत जोडली असून त्याप्रमाणे अटीशर्ती ठेवून करारनामा करणे हिताचे होईल.

**मिलन म्हात्रे :-**

ह्या करारनाम्यामध्ये कमर्शीयल बेस कुठे दिले आहे?

**मा. सभापती :-**

सदरचा विषय नामंजुर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. १९९ :-**

बंदरवाडी (खारी) स्मशानभूमीत स्वखर्चाने विविध विकास कामे करण्याबाबत परहीत सेवा संघ यांच्या आलेल्या प्रस्तावाबाबत विचार विनिमय करून निर्णय घेणे.

**ठराव क्र. १८० :-**

सदरचा विषय मा. सभापतींच्या आदेशानुसार नामंजुर करण्यांत आला.

(प्र. सचिवांनी प्रकरण क्र. २०० चे वाचन केले.)

**शरद पाटील :-**

हा विषय मंजुर करताना आपण ज्या पाईन लाईन मातीत टाकल्या आहेत का, लोकांच्या उपयोगासाठी टाकलेल्या आहेत आणि त्या प्रत्येक पाईप लाईनला एन्ड लावण्याची जबाबदारी कुणाची आहे.

**कांबळे :-**

ठेकेदाराची आहे.

**शरद पाटील :-**

त्या ठेकेदाराने लावले नाही तर त्याला शिक्षा कोण करेल? मी त्याबाबतीत सांगतोय, आज किती महिने झाले.

**मिलन म्हात्रे :-**

शहरामध्ये कित्येक ठिकाणी पाईप लाईनमध्ये लिकेज आहे.

**कांबळे :-**

दोन दिवसामध्ये काम करतो.

**प्रकरण क्र. २०० :-**

मा. आयुक्त साो. यांनी मंजुर केलेल्या कामांचे अवलोकन करणे. (पाणी पुरवठा विभाग)

**ठराव क्र. १८१ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकरिता मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेल्या कामांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | मंजुर संस्थेचे / ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| १ | ८० मि.मी. ते ५०० मि.मी. स्लूस व्हॉल्वची दुरुस्ती व स्पिंडल बनविणे. | ४,९५,०८५/- | हिरा मजूर कामगार सहकारी संस्था |
| २ | प्रभाग क्र. १० व ११ मधील पाण्याच्या उंच टाक्यांची दुरुस्ती करणे. | ४,७४,३२९/- | अंबिका मजुर कामगार सह. संस्था |
| ३ | वर्सोवा गावातील जुनी सिमेंटच्या जलवाहिनी ऐवजी बिडाची जलवाहिनी टाकणे. | ४,६४,९६५/- | निळकंठ मजूर कामगार सह. संस्था |
| ४ | अस्मिता पार्क व सिल्वर पार्क टाकीच्या कामाचे मजबुतीकरण करणे. | ४,९४,२५५/- | अंबिका मजूर कामगार सह. संस्था |
| ५ | प्रभाग क्र. ११ मध्ये मोमीन कॉलनी व लक्ष्मीबाग येथे सिमेंटच्या जलवाहिन्या बदलून बिडाच्या जलवाहिन्या टाकणे. | ४,५३,९०८/- | निळकंठ मजूर कामगार सह. संस्था |
| ६ | भाईंदर (प.) येथील गोम्स स्ट्रीट येथे १५० मि.मी. व्यासाची बीडाची जलवाहिनी टाकणे. | २,२९,६०८/- | निळकंठ मजूर कामगार सह. संस्था |
| ७ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील मुख्य वितरण | ४,७५,२००/- | सरजू मजूर कामगार सह. संस्था |

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम | मंजुर संस्थेचे / ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| | जलवाहिनीवरील एअरव्हॉल्ववर लोखंडी आच्छादन लावणे. | | |

तरी उपरोक्त प्रस्तावास मा. स्थायी समिती अवलोकन करुन मंजुरी देत आहे.

**सुचक :- श्री. चंद्रकांत वैती.** **अनुमोदन :- श्री. दिनेश नलावडे.**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**मा. सभापती,**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. सभापती :-**

सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, अधिकारी वर्ग, कर्मचारी वर्ग यांचे सर्वांचे आभार मानून आजची सभा संपल्याचे जाहिर करत आहे.

**सभा संपल्याची वेळ :- दुपारी २.१५**

**सभापती**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**